## ४ राज्यातील निवडणुकीनंतर नरेंद्र मोदींना खुर्ची सोडावी लागेल: विजय वडेट्टीवार

नागपूर, : पक्ष फोडून, अमादार फोडून गुजराती जोडीने राज्याला उद्ध्वस्त केले आहे, ४ राज्यातील निवडणुकीनंतर नरेंद्र मोदी यांना त्यांची खुर्ची सोडावी लागेल. खोक्यांचे सरकार आहे, प्रत्येकाला खोक्यांची अपेक्षा आहे. खोके जिथे, तिथे आम्ही, म्हणणाऱ्यांनी खोके आहे, तिथे धोके आहे हे समजून घेतले पाहिजे. जनता यांची जिरवल्या शिवाय राहणार नाही हे समजून घ्यावे, असे म्हणत काँग्रेस नेते तथा राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पीएम मोदींवर निशाणा साधला आहे.सत्तेत बसून गांधी आणि नेहरूला जर तुम्ही जबाबदार धरत असाल, तर तुम्ही सत्तेत कशाला बसले आहात? सरकारी पैशातून मेजवानी कशाला मारत आहे.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १८१ * * नागपूर * | सोमवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्रलेख **खरीखरी...**

## मोदीजी आणि राहुलजी

काल महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्ष नेते राहुल गांधी दोघांनीही आपापला दौरा केला. पंतप्रधानांनी काल सात कार्यक्रमांत आपली हजेरी लावली. नेहमीप्रमाणे काँग्रेसचे नाव घेतल्याशिवाय त्यांचे भाषण संपत नसते. तसेच कालही झाले. एका ठिकाणी तर त्यांनी बाजूला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री बसलेले असताना सध्याच्या सरकारवरच टीका करून टाकली. इतरही अनेक कार्यक्रम धुमधडाक्यात केले. त्यामुळे आता हरियाणा तर गेलाच आहे. पण महाराष्ट्र जाऊ नये, यासाठी खुद्द मोदीजींनी कंबर कसलेली आहे. यावर सध्या जास्त भाष्य न करणे बरे! कालच विरोधी पक्षनेते राहुल गांधीही महाराष्ट्रात आले. त्यांनी कोल्हापुरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले आणि छत्रपती शिवाजी महाराजांची थोरवी आपल्या परीने गायली. पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तम वक्ते आहेत. ते जिथे जातात तेथील एखादा मुद्दा उकरून काढतात. राहुल गांधी तेवढे चांगले वक्ते नाहीत. पण ते ज्या पद्धतीने जनतेत मिसळतात, कुणाच्याही मनात सहजपणे प्रवेश करतात. अगदी लहान मुलींपासून अगदी म्हाताऱ्या आजीबाईपर्यंत सर्वांनाच ते आपलेसे वाटतात. कुणाला काका म्हणतात, कुणाला भाऊ म्हणतात तर कुणाला पुत्र म्हणून, तर कोणाला मित्र म्हणून त्यांच्यासोबत राहताना साधी सोपी सहजता अनुभवता येते. काल एक कार्यक्रम रद्द झाल्यामुळे राहुल गांधी एका दलित रिक्षाचालकाच्या घरात गेले. सरळ त्यांच्या स्वयंपाक घरात जाऊन वांग्याची भाजी बनवली. हा व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाला. पंतप्रधानांसारखा ताम-झामसतानाही त्यांचे बारीक-सारीकव्हिडिओ सुद्धा आजकाल सर्वत्र सहज पसरतात. त्याचा त्यांना राजकीय लाभ होतो. दोन वर्षांपूर्वी खिजगणतीतही नसणारे राहुल गांधी आता वाहिन्यांनाही टाळता येत नाहीत. राहुल गांधींची ही जादू त्यांना लोकसभेत दुप्पट जागा देऊन जाते. तर मोदीजींच्या अपेक्षेप्रमाणे ४०% जागा कमी होतात. आता ज्या वार्ता येत आहेत. त्यात जम्मू काश्मीर आणि हरियाणा या राज्यातही राहुलग्रह चांगलाच चमकताना दिसतो आहे. आता यापुढे मोदी यांचे ग्रह या राहुल ग्रहाचा कसा मुकाबला करतात. यावर भारताचे राजकारण कोणत्या मार्गाने जाते हे ठरणार आहे. एक गोष्ट मात्र खरी आहे. ती ही की, यापुढे जिथे जिथे मोदी तिथे तिथे राहुल किंवा जिथे जिथे राहुल तिथे तिथे मोदी असा साग्रसंगीत कार्यक्रम जनतेच्या नेत्रांचे पारणे फेडणार आहे. आगे आगे देखिये, होता है क्या!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं उद्धव ठाकरेंना आव्हान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, ०६ :

विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यभरात सध्या ठिकठिकाणी सभा आणि मेळावे सुरु असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकीकडे महायुती तर दुसरीकडे महाविकास आघाडी अशा राज्यभरात सभा सुरु आहेत. त्याचबरोबर विविध मतदारसंघात निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. पक्ष संघटनेचा आढावा नेत्यांकडून घेतला जात आहे. यातच काही पदाधिकारी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही दिसून येत आहे. या अनुषंगाने आज शिवसेना (शिंदे) युवासेनेचे नेते तथा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे माजी स्थायी सभापती दिपेश म्हात्रे यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत (ठाकरे) प्रवेश केला. त्यामुळे कल्याण-डोंबिवलीत शिवसेनेला (शिंदे) धक्का बसला.
दरम्यान, दिपेश म्हात्रे यांच्या पक्ष प्रवेशावेळी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला. मात्र, यावेळी उद्धव ठाकरे यांनी खासदार श्रीकांत शिंदेंचा कार्ट असा उल्लेख केला. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर दिलं. मुलाशी काय भिडता? बापाशी भिडा, असं आव्हान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता दिलं.



### मुख्यमंत्री शिंदे काय म्हणाले?

मला त्यांच्यावर (उद्धव ठाकरे यांच्यावर) आरोपाला आरोप आणि उत्तर द्यायचं नाही. मी कामामधून उत्तर देतो. त्यामुळे ते बिथरले आहेत. त्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. लाडकी बहीण योजनेमुळे त्यांना धडकी भरली अशी परिस्थिती त्यांची झालेली आहे. त्यामुळे मी सांगतो बापाशी भिडा ना मुलाशी काय भिडताय, असं आव्हान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांना दिलं आहे.

### उद्धव ठाकरे काय म्हणाले होते?

आता त्या ठिकाणी जे खासदार आहेत. मुख्यमंत्र्यांचं कार्ट. लोकसभेच्या निवडणुकीत कल्याण-डोंबिवली लोकसभा मतदारसंघांत पैसा ओतला. सत्तेचा गैरवापर करण्यात आला. एका शिवसेनेच्या पदाधिकाऱ्याच्या विरोधात प्रचार करण्यासाठी देशाच्या पंतप्रधानांना त्या ठिकाणी यावं लागलं. मात्र, तरी देखील कल्याण-डोंबिवलीकरांनी जवळपास लाख मते आपल्या भगव्याला दिले आहेत. आता तुमची सर्वांची ताकद विधानसभा निवडणुकीमध्ये दाखवून द्या, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं होतं.

## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर

### साहित्य परिषदेकडून घोषणा, दिल्लीत पार पडणार ९८ वे संमेलन

■ महासागर प्रतिनिधी
नईदिल्ली, ०६ :



अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे यंदा ९८ वे वर्ष असून ते राजधानी दिल्ली येथे पार पडणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. या संदर्भातील घोषणा पुण्यातील साहित्य परिषदेच्या पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे. पुणे येथे साहित्य परिषदेच्या पत्रकार परिषदेत डॉ. तारा भवाळकर यांची अध्यक्ष पदावर निवडण करण्याची घोषणा करण्यात आली. ही घोषणा अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्राध्यापक उषा तांबे यांनी केली आहे. तारा भवाळकर यांचे वय ८३ वर्षे इतके आहे. तारा भवाळकर यांचा लोक संस्कृती या विषयात सखोल अभ्यास आहे. तसेच त्यांनी प्राध्यापक म्हणूनही अनेक वर्षे काम केले आहे.

**कोण आहेत डॉ. तारा भवाळकर?**

डॉ. तारा भवाळकर या वैचारिक लेखिका असून त्यांचा जन्म १ एप्रिल १९३९ साली झाला आहे. डॉ. भवाळकर यांनी अनेक वर्षे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. निवृत्तीनंतर त्यांनी पुणे येथील ललित कला अकॅडेमी आणि मुंबई विद्यापीठ लोककला अकॅडेमी येथे अतिथि प्राध्यापक म्हणून देखील काम केले आहे.
लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोककला या विषयांमध्ये त्यांचा सखोल अभ्यास होता. याचसोबत नाट्यसंशोधन, संतसाहित्य, एकांकिका, ललित लेखन आणि स्त्री जाणिवांवर भाष्य करणारे लेखन त्यांनी प्रामुख्याने केले आहे. तारा भवाळकर यांचा मराठी विश्वकोश, मराठी वाङ्मयकोश आणि मराठी ग्रंथकोश या महत्त्वाच्या कार्यातही त्यांचे योगदान आहे. डॉ. तारा भवाळकर यांनी लोकसाहित्यापासून नाट्यशस्त्रापर्यंतचा संशोधक संदर्भ कोष, मार्क्सवाद ते गांधीवाद यांचा सूक्ष्म अभ्यास, भारतीय संस्कृतीपासून आधुनिक स्त्रीवादी चळवळीच्या साक्षेप समीक्षकण, साहित्यापासून सामाजिक चळवळ अशा सर्वच विषयांत त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. मराठी पौराणिक नाटकाची जडणघडण : प्रारंभ ते १९२० या त्यांच्या पीएचडी प्रबंधाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्वोत्कृष्ट प्रबंध पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे.

**महिला टी-२० विश्वचषक**

## भारताने पाकिस्तानचा पराभव केला



**नईदिल्ली, ०६ :** महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा ६ विकेट्सने पराभव केला आहे. दुबईतील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रविवारी पाकिस्तानने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. संघाने २० षटकांत ८ गडी गमावून १०५ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने १८.५ षटकांत ४ गडी गमावून लक्ष्य गाठले. महिला २० विश्वचषकातील ८ सामन्यांमध्ये भारताचा पाकिस्तानवर सहावा विजय आहे. भारताकडून २९ धावा केल्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौर दुखापतग्रस्त झाली. शेफाली वर्माने सर्वाधिक ३२ धावा केल्या. तर अरुंधती रेड्डीने ३ बळी घेतले. अरुंधती सामनावीर ठरली. तत्पूर्वी, पाकिस्तानकडून निदा दारने सर्वाधिक २८ धावा केल्या. मुनिबा अलीने १७ धावा, अरुब शाहने १४ धावा आणि फातिमा सनाने १३ धावा केल्या. बाकीचे फलंदाज विशेष काही करू शकले नाहीत. भारताकडून अरुंधती रेड्डीने ३ तर श्रेयंका पाटीलने २ बळी घेतले. दीप्ती शर्मा, आशा शोभना आणि रेणुका सिंग यांना प्रत्येकी १ यश मिळाले.



# तीन ऑक्टोबर मराठी अभिजात भाषा गौरव दिन म्हणून साजरा करणार

**मुंबई, दि. ६ प्रतिनिधी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल आज राज्य मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाचे अभिनंदन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व इतर मंत्रीगण या बैठकीस उपस्थित होते.

तीन ऑक्टोबर हा दिवस यापुढे 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. या संदर्भातील मंत्रिमंडळाचा ठराव मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी वाचून दाखवला. यात म्हटले आहे की, या ऐतिहासिक निर्णयाबद्धल राज्य मंत्रिमंडळ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आभार व्यक्त करते, तसेच राज्य मंत्रिमंडळाच्यावतीने केंद्रीय मंत्रिमंडळाचे अभिनंदन करण्यात येत आहे. या प्रस्तावाचा आशय असा, मराठी भाषा मुळातच अभिजात होती. तिला अभिजात दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्राने सनदशीर मार्गाने प्रयत्न केले. गेले दशकभर यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न करण्यात येत होते. यासाठी प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील अभिजात मराठी भाषा समितीने मोठे काम केले. मराठी भाषा विभागाने भाषा संचालनालय , मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, साहित्य संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांच्या माध्यमातून मराठीचा अखंड जागर सुरू ठेवला आहे. मराठी साहित्य परिषद आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी भाषकांसह मराठीवर प्रेम करणाऱ्यांसाठी पर्वणी ठरत आले आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचा तमाम मराठी भाषिकांना आनंद झाला आहे. मराठी माणसांसाठी हा निर्णय ऐतिहासिक आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी अनेक थोर साहित्यिक, संशोधक, अभ्यासकांनी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या मेहनतीला या निर्णयामुळे यश लाभले आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेच्या विकासासाठी आणखी ऊर्जा, प्रेरणा मिळाली आहे. मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. रिद्धपूर येथे या विद्यापीठाचे मुख्यालय असणार आहे. मराठी भाषेतील अभ्यास, संशोधन याला चालना देता येणार आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणे जगभरातील मराठी प्रेमींसाठी अभिमानास्पद, गौरवास्पद आहे. या निर्णयासाठी हे मंत्रीमंडळ केंद्र सरकारचे अभिनंदन करत आहे, असे प्रस्तावात म्हटले आहे. मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री केसरकर यांनी मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडवणीस, उपमुख्यमंत्री पवार यांना पुष्पगुच्छ देत अभिनंदनही केले. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने भाषा संवर्धनाच्या दृष्टीने मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे. प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांचे बळकटीकरण, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थ्यांना भरीव मदत करणे या गोष्टी साध्य होणार असल्याचेही प्रा. पठारे यांच्या समितीने नमूद केले आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

## महाराष्ट्र दौऱ्यात सुमारे 56,100 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचा शुभारंभ

**नवी दिल्ली, दि. ६ : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी 5 ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून, वाशिम आणि ठाणे येथे विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. प्रधानमंत्री सकाळी 11.15 वाजता वाशिममधील जगदंबा माता मंदिरात दर्शन घेतील आणि संत सेवालाल महाराज आणि संत रामराव महाराज यांच्या समाधीस्थळी श्रद्धांजली वाहतील.

वाशिममध्ये प्रधानमंत्री 23,300 कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुपालन क्षेत्रातील विविध उपक्रमांचा शुभारंभ करतील. या योजनेत प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा 18वा हप्ता वितरित केला जाणार असून, यामुळे सुमारे 9.4 कोटी शेतकऱ्यांना 20,000 कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. प्रधानमंत्री कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत सुमारे 1,920 कोटी रुपयांचे 7,500 हून अधिक प्रकल्प समर्पित करतील. तसेच, 9,200 शेतकरी उत्पादक संघटनांचे राष्ट्रार्पण करतील.

तसेच, बंजारा समाजाच्या समृद्ध वारशाचे प्रतीक असलेल्या "बंजारा विरासत संग्रहालयाचे" प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

**ठाण्यातील नागरी गतिशीलता वाढवण्यासाठी 32,800 कोटी रुपयांच्या प्रकल्पांचा शुभारंभ**

प्रधानमंत्री ठाणे येथे सुमारे 32,800 कोटी रुपयांच्या विविध नागरी विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. यामध्ये मुंबई मेट्रो लाईन 3 फेज 1 च्या आरे जेव्हीएलआर ते बीकेसी या टप्प्याचे उद्घाटन होणार आहे. हा प्रकल्प मुंबईतील शहरी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

याशिवाय, ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि उन्नत पूर्व मुक्त मार्ग विस्तार प्रकल्पांचीही पायाभरणी होईल. ठाणे महापालिकेच्या नव्या इमारतीचा पायाभरणी समारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पार पडणार आहे.

**नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्राच्या विकासासाठी नैना (NAINA) प्रकल्पाची पायाभरणी**

ठाण्यातील आणखी एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (NAINA) प्रकल्प, ज्याची फेज-1 पायाभरणी होणार आहे. या प्रकल्पामुळे या भागातील पायाभूत सुविधा विकासाला गती मिळणार आहे.

या दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या कृषी, नागरी आणि औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या विविध महत्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत, ज्यामुळे राज्याच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल.

# वाल्मिकी समाजाचे नेते करोतिया यांनी सोडली काँग्रेस

**उल्हासनगर, दि. ६ : प्रतिनिधी**

उल्हासनगर शहरातील वाल्मिकी समाजाचे दबंग नेते राधाचरण करोतिया यांनी कॉंग्रेस मध्ये सुरु असलेल्या मनमानी कारभाराला कंटाळुन कॉंग्रेस पक्षातुन बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असुन त्यांनी आपला राजीनामा शहर अध्यक्ष रोहित साळवे यांना पाठवला आहे. उल्हासनगर शहरातील वाल्मिक समाजाचे नेते राधाचरण करोतिया यांच्या कुटूंबाला दलित चळवळीचा वारसा आहे. त्यांचे वडील रामकिसन करोतिया हे भारतीय दलित पॅंथर मध्ये आघाडीचे नेते होते. त्यांची सुनबाई मालती करोतिया ह्या २००३ उल्हासनगर महापालिकेच्या महापौर झाल्या होत्या तेव्हा पासुन राधाचरण करोतिया हे कॉंग्रेस मध्ये सक्रिय आहेत. त्यांची कॉंग्रेस च्या वरिष्ठानी सफाई कामगार प्रदेश अध्यक्ष म्हणुन नियुक्ती केली होती . तर शहर कॉंग्रेस च्या नेतृत्वाखाली काम करत असताना अनेक पदाच्या रेवळया दिल्या होत्या, मात्र पदांपासुन करोतिया यांना वंचित ठेवन्यात आले आहे. दरम्यान कॉंग्रेस मध्ये सुरु असलेल्या या मनमानी कारभाराला कंटाळुन करोतिया यांनी कॉंग्रेस चे शहर अध्यक्ष रोहित साळवे यांच्या कडे राजीनामा सोपवला आहे. मात्र आता राधाचरण करोतिया हे शिवसेनेत ( उबाठा ) जाण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

# मजूर संस्थेच्या संचालकपदी दत्ता वझे बिनविरोध

**बोईसर, दि. ६ : प्रतिनिधी**



पालघर मजूर सहकारी संस्था संघाच्या (फेडरेशन) संचालकपदी सोमटयाचे दत्ता वझे यांची बिनविरोध निवड झाली आहे. हे फेडरेशन पालघर आणि ठाणे जिल्ह्यात काम करते. पुढील पाच वर्षांसाठी त्यांची या पदावर निवड झाली आहे. ते अनेक वर्षांपासून बांधकाम व्यवसायात सक्रिय आहेत. तळागाळातील नागरिकांसाठी त्यांनी नेहमीच काम केले आहे. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# 'नो पार्किंग'मध्येच वाहनांची पार्किंग

## वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा



**बोईसर, दि. ६ : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद परिसरात वाहतुकीचा बोजवारा उडत असून, 'नो पार्किंग'मध्येच वाहने उभी केली जात आहेत. कुठेही वाहने उभी केली जात असल्याने याप्रकरणी कारवाई केव्हा होणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ग्रामीण भागाचे मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेत विविध कामानिमित्त ग्रामीण भागातील नागरिक येतात. जिल्हा परिषद परिसरात वाहने ठेवण्यासाठी काही महिन्यांपूर्वी 'नो पार्किंग'च्या रेषा आखल्या होत्या. वाहनांकरीता पार्किंगचे नियमही ठरविण्यात आले. 'नो पार्किंग'मध्ये वाहन दिसल्यानंतर वाहनावर ५०० दंड म्हणून आकारले जातील. परंतू, त्यानंतर कारवाईची मोहिम थंडावली. पार्किंगच्या दिशेने सूचना फलक लावण्यात आलेल्या ठिकाणीच वाहने उभी करण्यात येतात. काही वाहने तर जिल्हा परिषद अध्यक्षांच्या कक्षाकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारालगतच उभी करण्यात येतात. यामध्ये दुचाकीसह चारचाकी वाहनांचादेखील समावेश आहे.

जिल्हा परिषद परिसरात वाहनांकरीता नियमावली ठरवून दिलेली असतानाही याचे पालन काही कर्मचारी, नागरीक, विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, वाहन चालकांकडून होत नसल्याचे दिसून येते. अनेकदा वाहनचालक कुठेही वाहने उभी करीत असल्यामुळे वाहतुकीची कोंडीदेखील होते. कुठेही वाहने उभी करणाऱ्यांविरूद्ध दंडात्मक कारवाई होणे अपेक्षीत आहे.

# पवित्रा हॉटेलचे पब बंद करण्याचे कोर्टाने दिले आदेश

**उल्हासनगर, दि. ६ : प्रतिनिधी**

उल्हासनगर कॅंप ३ येथील पवित्रा हॉटेलच्या बेकायदा बांधकामा बद्दल जो पर्यंत निवाडा होत नाही, तो पर्यंत हॉटेल मध्ये सुरु असलेले पब बंद ठेवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालया ने मंगळवारी एका सुनावणीत दिल्याने हॉटेल मालकाला मोठा धक्का बसला आहे . मात्र कोर्टाच्या आदेशा ची अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे समजते .

उल्हासनगर कॅम्प नंबर तीन येथील कल्याण अंबरनाथ रोड वर असलेले पवित्रा हॉटेल मधील काही भाग बेकायदेशीर असल्याची तक्रार राष्ट्रवादी कॉंग्रेस चे शहर अध्यक्ष भरत गंगोत्री यांनी केली होती. या तक्रारी वरून महापालिकेच्या नगररचना विभाग आणि अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई सुरु केली होती. नुकतेच महापालिकेच्या वतीने पवित्रा हॉटेल ला अतिक्रमित बांधकाम दोन दिवसात निष्कासित करण्याची नोटीस बजावली होती. या नोटीस च्या विरोधात पवित्रा हॉटेल च्या मालकाने उच्च न्यायालयात आणि नगरविकास विभाग दोन मध्ये याचिका दाखल केली होती. त्या अनुषंगाने मंगळवारी झालेल्या सुनावणीत न्यायाधिश सौनक यांनी शासना ला आदेश दिले आहेत, की पवित्रा हॉटेल चा निवाडा दोन महिन्याच्या आत करा, तो पर्यंत हॉटेल मध्ये सुरु असलेले पब तत्काळ बंद करण्यात यावे. दरम्यान न्यायालयात महापालिकेच्या वतीने ॲड . विजय पाटील यांनी तर हॉटेल पवित्रा च्या वतीने ॲड . मंदार लिमये यांनी बाजू मांडली . न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे दोन महिन्या च्या आत पवित्रा हॉटेल चा निपटारा झाला नाही, तर पुन्हा कोर्टाचा दरवाजा ठोठावणार अशी माहिती तक्रारदार भरत गंगोत्री यांनी दिली आहे . कोर्टाच्या अवमान प्रकरणी या पूर्वीच महापालिकेवर दहा हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आलेला आहे . या प्रकरणी नगरविकास विभागा ने तातडीने महापालिके कडून माहिती मांगवली असल्याचे समजते.

# खारघरमधील तरुणांचा शेकापमध्ये जाहीर पक्ष प्रवेश

**पनवेल, दि. ६ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रामध्ये सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असताना आणि महाविकास आघाडीला लोकांची पसंती वाढत चालल्यामुळे. खारघर मधील अल्पसंख्याक समुदायाचे आसिफ खान यांच्या मार्गदर्शनाखाली साकिब खान, रशीफ खान, बिलाल मंसूरी जावेद खान आसिफ मुकादम अब्दुल कलाम अब्दुल सलाम आदींच्या बरोबरीने शेकडो मुस्लिम युवकांनी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून पनवेल येथे झालेल्या एका कार्यक्रमात माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीमध्ये शेतकरी कामगार पक्षात जाहीरपणे प्रवेश केला.

हा पक्ष प्रवेश करण्यासाठी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य देवेंद्र मढवी, खारघर चे समाजसेवक बिलाल पटेल यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना आसिफ खान यांनी सांगितले आमचे गेल्या दहा वर्षात खूप नुकसान झाले. याच कारणामुळे आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून शेतकरी कामगार पक्षात पक्षप्रवेश करत आहोत. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले आज आपण जो पक्ष प्रवेश केला आहे तो किती योग्य आहे हे थोड्याच दिवसात कळेल. आणि शेतकरी कामगार पक्षांमध्ये आपल्याला सन्मान जनक वागणूक मिळेल याची गाव्ही देतो . या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी गणेश कडू देवा पाटील, देवेंद्र मढवी, बिलाल पटेल, रा गो पाटील अजित अडसूळे, प्रतीक ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाची 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत विशेष धुरीकरण मोहीम

**नवी मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी**

'स्वच्छता ही सेवा'मोहीमेमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत नमुंमपा आरोग्य विभागामार्फत विशेष धुरीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात डासांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्याकरिता नियमित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जातो. यादृष्टीने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पूर्ण कार्यक्षेत्राचा विचार करुन साप्ताहिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे, जेणेकरुन प्रत्येक कार्यक्षेत्रात आठवड्यातून एकदा फवारणी व धुरीकरण करण्यात येईल.

नमुंमपा कार्यक्षेत्रात डास प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्याकरिता दि. 5 ते 11 ऑक्टोबर 2024 या एक आठवड्याच्या कालावधीत विशेष धुरीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहीमेमध्ये प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात एकाच दिवशी रासायनिक धुरीकरण करण्यात येणार आहे.

याकरीता 5 ते 11 ऑक्टोबर या कालावधीत एकूण सहा गट तयार करण्यात आले असून प्रत्येक गटामध्ये 4 ते 5 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचा समावेश आहे. यामध्ये –

दि. 5 ऑक्टोबर रोजी सीबीडी, वाशीगाव, इंदिरानगर, राबाडा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात, दि. 7 ऑक्टोबर रोजी से-48 नेरूळ, कुकशेत, सानपाडा, खैरणे, दिघा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात तसेच 8 ऑक्टोबर रोजी करावे, नेरुळ-2, तुर्भे, महापे, ऐरोली नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात रासायनिक धुरीकरण करण्यात येणार आहे.

# वृत्तपत्र विक्रेते वारूबा वाघमोडे कालवश

**लासलगाव दि. ६ प्रतिनिधी**



आमचे लासलगाव येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते व वारूबा सखाराम वाघमोडे यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 69 होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, चार मुली, एक मुलगा आणि सून असा परिवार आहे. दैनिक विक्रीसाठी त्यांनी अत्यंत निष्ठेने काम केले. त्यांचा दशक्रिया विधी 9 ऑक्टोबर 2024 मौजे दहिवद, तालुका- चांदवड, नाशिक येथे पार पडणार आहे. दैनिक महासागर च्या वतीने त्यांना श्रद्धांजली!

# मोखाडा तहसील कचेरीत अवघे आठच कर्मचारी

## रिकाम्या खुर्च्यांमुळे कामे खोळंबली




**मोखाडा, दि. ६ : प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या तुकड्याला आपण मराठीत तहसील ( तालुका ) म्हणतो या तालुक्याचा कारभार ज्या तहसीलदार कार्यालयातून चालतो अशा तहसील कार्यालयात कर्मचारीच नसल्यामुळे नागरिकांची हेळसांड बघायला मिळत आहे. वेळेवर कामे न झाल्यामुळे तालुक्यातील नागरिक त्रस्त झाले आहेत. महसूल विभागामधील २९ पदांपैकी जवळपास २१ पदे रिक्त आहेत. अवघ्या आठच कर्मचाऱ्यांमुळे कार्यालयातील महसुली कामे, उत्पन्न दाखले, जातीचा दाखला यांसारख्या इतरही महत्वाच्या कामांचा वेग मंदावला असून नागरिकांना कागदपत्रांसाठी तहसील कार्यालयात सारखे हेलपाटे मारावे लागत आहेत.

तालुक्याचे तहसीलदार कार्यालय हे प्रमुख शासकीय कार्यालय असून येथून तालुक्याच्या शासकीय, महसुली कामांचा गाडा हाकला जातो. परंतू ही महसुली कामे करणाऱ्या कर्मचारी वर्गातील महसूल सहाय्यक १४ पदापैकी ५ कार्यरत असून तब्बल ९ पदे रिक्त आहेत. तर तलाठी १३ पदापैकी ११ पद रिक्त आहेत. तसेच मंडळ अधिकारी २ पदापैकी १ पद रिक्त आहे. अशा एकूण २९ महत्वाच्या पदापैकी २१ पदाच्या खुर्च्या अजूनही रिक्त पडलेल्या आहेत. त्यामुळे तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून शासकीय,शैक्षणिक कामासाठी आवश्यक असणारा उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, जागेचा फेरफार नोंद, गाव पाड्याचे अभिलेख अद्ययावत करणे, खरेदी खताची नोंद, नैसर्गिक आपत्तीची माहिती देणे, सातबारा दुरुस्ती करणे आदी कामांसाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. एकीकडे शासन आपल्या दारी कार्यक्रमाची वाहवा होत असताना ही रिक्त पदे भरायची कोणी आणि नसेल तर शासकीय कामांना वेग येणार कसा ? हा खरा सवाल आहे. त्यामुळे निदान नवीन कर्मचारी नियुक्ती होत नसेल तर कामावर रुजू आहेत, त्या अधिकार्याच्या बदली करू नका, अशी मागणी करण्यात आली आहे.

> तहसील कार्यालयात काम घेऊन गेले की हा साहेब नाही आणि असलाच तर तीन चार टेबलचे काम त्यांना एकट्यालाच पहायला लागते. त्यामुळे तुमची कागदपत्रे जमा करा, सात आठ दिवसांनी या असे सांगतात. मग आम्ही अजून किती हेलपाटे मारायचे तुम्ही सांगा साहेब."
>
> **-ईश्वर बाबरे,मोखाडा तालुका सचिव, श्रमजीवी संघटना**

# ग्रामपंचायतीने विद्यार्थ्यांना दिली स्वच्छतेची प्रतिज्ञा



**वाडा, दि. ६ : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारच्यावतीने आयोजित स्वच्छता ही सेवा पंधरवड्याचा समारोप चिंचघर ग्रामपंचायतच्या वतीने ह. वी. पाटील विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची प्रतिज्ञा देऊन,तसेच स्वच्छता विषयक उपक्रमात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

केंद्र व राज्य सरकारच्या वतीने दिनांक 14 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2024 या कालावधीत स्वच्छते विषयक जनजागृती निर्माण करण्यासाठी स्वच्छता ही सेवा या पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीच्या स्वच्छता अभियानाची स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता ही संकल्पना होती. या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन चिंचघर ग्रामपंचायत च्या वतीने करण्यात आले होते.

कायमस्वरूपी अस्वच्छ ठिकाने स्वच्छ करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट बनवणे, सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोष खड्ड्यांची निर्मिती करणे, स्वच्छता विषयक वाहने व उपकरणांची स्वच्छता करणे, स्वच्छता कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करणे ,खाऊ गल्ल्यांमध्ये स्वच्छता करणे, एक झाड मातेच्या नावाने लावून वृक्षारोपण बाबत जनजागृती करणे अशा विविध उपक्रमांचे आयोजन मागील पंधरा दिवस ग्रामपंचायतने केले होते.

स्वच्छता विषयक जनजागृती करण्यासाठी चिंचघर ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनविणे स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतच्या वतीने प्रशस्तीपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेची प्रतिज्ञा घेऊन स्वच्छता विषयक जनजागृती करण्यात आली. स्वच्छता विषयक पंधरवड्याच्या समारोपप्रसंगी ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रेमा नांगरे, उपसरपंच मनेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य गिरीश पाटील, कैलास ठाकरे, संगीता भोईर, शाळेचे प्राचार्य संदेश पाटील, सुनील पाटील, जितेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी अच्युत पाटील, चेतन पाटील, महेंद्र ठाणगे, चंद्रकांत ठाणगे यांनी विशेष मेहनत घेतली.

# सफाळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रोजगार मेळावा



**सफाळे, दि. ६ : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य व प्रशिक्षण योजना मेळावा अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था सफाळे येथे आज (दि. 3) रोजी रोजगार मेळावा संपन्न झाला. या रोजगारा मेळाव्यास कौशल्य विकास विभागाकडून समन्वयक करुणा वैद्य तर महाराष्ट्र उद्योजकता विकास मंडळाकडून स्वाती भोईर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान मेघराज शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी चंदुलाल घरत सर यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सफाळे गावच्या सरपंच तनुजा कवळी , उपसरपंच राजेश म्हात्रे, पास्थळ आयटीआयचे प्राचार्य अतुल राऊत सर तसेच लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रमोद पाटील सर, कोरे गावचे सरपंच प्रदीप वर्तक लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष दिनकर वर्तक तसेच प्रमोद राऊत हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य नितीन वर्तक यांनी केले तर सूत्रसंचालन पंकज म्हात्रे यांनी केले. यावेळी सुमारे 300 उमेदवार हजर होते आणि 7 कंपनी प्रतिनिधींचे स्टॉल तसेच सपोर्ट संस्थेचे व उद्योजकता विकास विभागाचा स्टॉल लावण्यात आले. या मेळाव्यात उपस्थित असलेल्या रोजगार इच्छुक काही युवकांना स्पॉट इंटरव्यू घेऊन लगेच कंपनीमध्ये नियुक्त पत्र दिले तर काही लोकांना त्यांचा बायोडाटा घेऊन कंपनी नंतर बोलवणार आहे, असे सांगितले. हा रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी संस्थेची निदेशक किरण बारी, संजय गहला, भागेश पाटील, दिशा पाटील, गणेश घरत आणि स्वाती पाटील यांनी मदत केली.

# अमितभाईंचा ऊर्जामंत्र...



सव्वादोन वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीचे सरकार खाली खेचण्यात भाजपाने यश मिळवले, आघाडीतील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली आणि ते पक्ष दुर्बल झाले. तरीही लोकसभा निवडणुकीत महाआघाडीने बाजी मारली ही भाजपाला डोकेदुखी ठरली. राज्यात भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) अशा तीन पक्षांचे मिळून महायुतीला २०० आमदारांचे समर्थन असले तरीही वेगवेगळ्या सर्वेक्षणात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे आमदार जास्त निवडून येतील असे अंदाज प्रकटले आहेत. महायुतीचे १२३ व महाआघाडीचे १५२ आमदार विजयी होतील असे सर्व्हे सांगत आहेत. म्हणूनच विधानसभा निवडणुकीत महायुतीचे काय होणार? हा प्रश्न मौल्यवान बनला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे महाराष्ट्रातील परिस्थितीवर बारीक लक्ष ठेऊन आहेत. अमित शहा यांनी मुंबईत दादर आणि वाशी येथे प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन केले. यावेळी राज्यात महायुतीचे सरकार येईल पण सन २०२९ मध्ये भाजपा स्वबळावर सत्तेवर येईल, असे त्यांनी भाकीत केले. अमित शहा देशाचे गृहमंत्री आहेत. राज्यातील राजकीय परिस्थिती व लोकांची मानसिकता कशी आहे, याचे गुप्तचर यंत्रणांचे अहवाल थेट त्यांना मिळत असतात. शिवाय पक्षाची स्वतंत्र यंत्रणा आहेच. निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शिस्तबद्ध केडर भाजपाच्या प्रचारासाठी नेहमीच सज्ज असते. राज्यात विधानसभा निवडणूक नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात अपेक्षित आहे. म्हणूनच भाजपाचे चाणक्य म्हणून ओळखले जाणाऱ्या अमितभाईंचे मार्गदर्शन पक्षासाठी मौल्यवान होते. महाराष्ट्र हे भाजपाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. देशाची आर्थिक राजधानी या राज्यात असून पुरोगामी व प्रगतिशील महाराष्ट्राची सत्ता भाजपाच्या हाती राहिली पाहिजे, यावर नरेंद्र मोदी, अमित शहा व जे. पी. नड्डा यांचा कटाक्ष आहे. म्हणूनच लोकसभा निवडणुकीनंतर अपयशाने निराश झालेल्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्यासाठी अमितभाईंनी महाराष्ट्रात व मुंबईत कार्यकर्त्यांचे मेळावे घेतले. काहीही करा पण सत्ता परत आणा, असे अमितभाईंनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपा निवडणूक लढवेल असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय जनता पक्षाची स्थापना दि. ६ एप्रिल १९८० रोजी मुंबईत झाली. पक्षाची चार दशकांची वाटचाल ही अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आदी ज्येष्ठ नेत्यांच्या नेतृत्वाखाली झाली. पण नरेंद्र मोदी व अमित शहा यांचा देशाच्या राजकीय क्षितीजावर प्रवेश झाल्यापासून भाजपाची देशभर घोडदौड सुरू झाली. देशात गेल्या दहा वर्षांत एकवीस राज्यांत भाजपाची सत्ता आली. पण भाजपाच्या स्थापनेपासून गेल्या चव्वेचाळीस वर्षांत महाराष्ट्रात भाजपाची एकदाही स्वबळावर सत्ता स्थापन झाली नाही. आज देवेंद्र फडणवीस हाच भाजपाचा महाराष्ट्राचा चेहरा आहे. राज्यात फडणवीस हेच भाजपाचे सर्वस्व आहेत. भाजपाचा कोणताही नेता स्वत: स्वतंत्र निर्णय घेऊ शकत नाही. फडणवीसांचा हिरवा कंदील असल्याशिवाय पक्षात कोणताही महत्त्वाचा निर्णय होत नाही. अर्थात मोदी व शहा यांचा फडणवीसांवर वरदहस्त आहे, म्हणून राज्यात फडणवीस हे भाजपाचे नंबर १ नेते आहेत.

सन २०१४ मध्ये देशात अनेक राज्यांत भाजपाची सत्ता आली. महाराष्ट्रात विधानसभेत १४४ हा बहुमताचा जादुई आकडा आहे. त्या निवडणुकीत भाजपाचे १२२ आमदार निवडून आले व नंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे समर्थन घेऊन भाजपाने पाच वर्षे युतीचे सरकार चालवले. अर्थातच त्या सरकारवर पूर्ण वर्चस्व भाजपाचे म्हणजे देवेंद्र फडणवीस यांचेच होते. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने ठाकरे यांच्या शिवसेनेची युती करून निवडणूक लढवली पण पक्षाचे १०५ आमदार निवडून आले. आता २०२४ मध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस यांना बरोबर घेऊन भाजपा निवडणुकीच्या रणसंग्रामात उतरली आहे.


राष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com


मी पुन्हा येईन... असे २०१९ च्या निवडणूक प्रचारात देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत होते, विरोधी पक्षांनी त्याची बरीच टिंगल-टवाळीकेली. पण निकालानंतर देवेंद्र यांनी मुख्यमंत्री म्हणून व अजितदादांनी उपमुख्यमंत्री म्हणून सर्वात अगोदर शपथ घेतली पण त्यांचे सरकार जेमतेम ८० तासच टिकले. त्यांचा पहाटेचा शपथविधी बरेच दिवस गाजत राहिला.

गेल्या दहा-अकरा वर्षांत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमधून अनेक दिग्गज नेते भाजपामध्ये आले. त्यांची यादी बरीच मोठी होईल, पण त्यामुळे भाजपाचा राज्यात विस्तार झाला. अनेक नेते चौकशीचा ससेमिरा चुकविण्यासाठी भाजपामध्ये आले तर अनेकजण सत्तेच्या मोहापायी आले. असे असूनही लोकसभा निवडणुकीत मतदारांनी महाआघाडीचे (विरोधी पक्षांचे) ३१ खासदार निवडून दिले व भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी या महायुतीच्या १७ जणांना विजयी केले.

केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असताना महायुतीला मोठा फटका बसला. भाजपाचे अगोदरच्या लोकसभेत २३ खासदार होते, यंदा केवळ नऊच विजयी झाले. केवळ भाषणबाजी करून नि घोषणांचा पाऊस पाडून तसेच विरोधकांच्या पाठी ईडी-सीबीआय लावून मते मिळत नाहीत, हे आता लक्षात आले असावे. सत्तेत असलेल्या दोन प्रमुख पक्षांची केलेली तोडफोड जनतेला आवडलेली नाही, हा संदेश लोकसभा निकालाने दिला आहे. येत्या निवडणुकीत मोदींचा करिष्मा व दीड कोटी लाभार्थी लाडक्या बहिणी हाच आता महायुतीचा प्रमुख आधार आहे.


बदलापूर शाळेत झालेला अत्याचार व आरोपीचे झालेले एन्काऊंटर, शाळेच्या संस्थाचालकांना दीड महिन्यांनी झालेली अटक, पुणे-वरळी-मुलुंड येथे झालेल्या हिट अँण्ड रनच्या घटनांच्या चौकशीचे गौडबंगाल सरकारला मुळीच शोभादायक नाही. नागपूरच्या हिट अँण्ड रन घटनेत प्रदेशाध्यक्षांच्या मुलाचे पुढे काय झाले, हे गूढ कायम आहे. धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी मुलुंडमधील एक इंचही जमीन दिलेली नाही, असे भाजपाचे बडे नेते लोकसभा निवडणुकीत प्रचारात रोज सांगत होते, प्रत्यक्षात राज्य मंत्रिमंडळाने ठराव करून मुलुंड, भांडुप व कांजूर मार्ग येथील मिठागरांच्या जमिनी धारावीसाठी देऊन टाकल्या. सरकार कोणाच्या दबावाखाली व कोणाच्या हितासाठी सर्व करतेय हे मतदारांना कळत नाही असे महायुतीला वाटते काय? नवरात्र सुरू होण्यापूर्वी राज्य मार्ग परिवहन, सिडको, आदी महामंडळांच्या अध्यक्षांच्या नेमणुका घाईघाईने झाल्या तेव्हाच निवडणुका उंबरठ्यावर आल्या हे लोकांना कळून चुकले.

लोकसभेतील अपयश विसरा व उमेदीने कामाला लागा. प्रत्येक बूथवर २० सदस्य करा, प्रत्येक बूथवर १० कार्यकर्ते हवेत. मतदान १० टक्के वाढले पाहिजे. विधानसभेला फाजिल आत्मविश्वास असता कामा नये. गटबाजी टाळा, एकमेकांच्या विरोधात बोलू नका, वादग्रस्त विधाने टाळा, विरोधकांच्या फेक नॅरेटिव्हला लगेच उत्तर द्या, आदी सूचना पक्षाच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांना करण्यात आल्या. काहीही करा, फोडाफोडी करा पण सत्ता आणा, असेही आव्हान करण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची मते भाजपाकडे वळली नाहीत म्हणून भाजपाचे नुकसान झाले, असा युक्तिवाद अगोदर संघाच्या मुखपत्राने केला व नंतर स्वत: फडणवीस तेच बोलू लागले. त्याच अजितदादांना बरोबर घेऊन भाजपा विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरत आहे. आपले १०५ आमदार सांभाळा आणि मित्रपक्षांचेही रूसवे-फुगवे काढा, अशी कसरत भाजपाला करावी लागते आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या संस्काराच्या मुशीतून तयार झालेले मनोहर जोशी, नारायण राणे, एकनाथ शिंदे असे राज्याचे तीन मुख्यमंत्री झाले. वडिलांच्या पुण्याईचा लाभ उद्धव ठाकरे यांनाही मिळाला. पण भाजपाला आजवर (देवेंद्र फडणवीस) एकदाच मुख्यमंत्रीपद मिळाले. सर्वाधिक आमदार असूनही गेल्या पाच वर्षांत भाजपाला (८० तास वगळून) मुख्यमंत्रीपद नव्हते. नोव्हेंबरमध्ये महायुतीला बहुमत मिळाले, तर पुढचे मुख्यमंत्रीपद कोणाला हे मात्र अजून गुलदस्त्यात आहे. पुन्हा एकनाथ शिंदे की देवेंद्र फडणवीस की पाच वेळा उपमुख्यमंत्री झालेले अजितदादा?

# 'आखाता'तील संघर्ष वाढणार

मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यातच हमासने इस्राईल वर हल्ला करून इस्राईलचे १२०० हून अधिक नागरिकांची हत्या करून २५१ नागरिकांचे अपहरण केले होते. हमासच्या या हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने गाझा पट्टीवर वर हल्ला करून गाझा पट्टी अक्षरशः जमीनदोस्त केली. इस्राईलने केलेल्या हल्ल्यात ४२ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून हमासचे १२ हजारांहून अधिक दहशतवादी ठार झाले आहेत. इस्राईल -हमास युद्धाला आज एक वर्ष पूर्ण झाली तरीही त्यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. इस्राईल - हमास युद्धाला एक वर्ष पूर्ण होत असतानाच इस्राईलने लेबनॉनवर हल्ला केला. इस्राईलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात लेबनॉन मधील हिजाबुल्ला या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेल्या हसन नसराल्ला हा ठार झाला. त्या अगोदर इस्राईलने लेबनॉनवर पेजर आणि वोकिटॉकी हल्ला केला होता. इस्राईलने लेबनॉन वर हल्ला करण्यामागचे कारण म्हणजे लेबनॉन हमासला करीत असलेले आर्थिक आणि लष्करी सहाय्य. लेबनॉन मधील हिजबुल्ले इस्राईल - हमास युद्धात हमासला आर्थिक आणि लष्करी सहाय्य पुरवत होते इतकेच नाही तर काही हिजबुल्ले प्रत्यक्ष युद्धातही सहभागी झाले होते त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी इस्राईलने लेबनॉनवर हल्ला करून हीजबुल्लाना लक्ष केले. इस्राईल - हमास नंतर इस्राईल -लेबनॉन संघर्षाने जग चिंतेत पडले असतानाच या संघर्षात इराणने उडी घेऊन संघर्षाची व्याप्ती आणखी वाढवली फक्त संघर्षाची व्याप्ती वाढवली नाही तर जगाची चिंताही वाढवली कारण इराण हा अरब देशातील किंबहुना इस्लामिक देशातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा देश आहे. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतल्याने हा संघर्ष आणखी वाढणार हे स्पष्ट झाले. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतली असा उल्लेख मी वर केला आहे त्याचे कारण इराण या युद्धात उडी घेईल असा अंदाज गेली वर्षभर लावला जात होता कारण इस्राईल -इराण संघर्ष जगाला नवीन नाही. या आधीही या दोन देशात युद्धाचा भडका उडाला आहे. १९८० सालच्या दशकात तर दोन देशात कायम युद्धाच्या ठिणग्या पडत होत्या त्यामुळे या युद्धात इराण केंव्हाही उडी घेईल असे म्हंटले जात होते ते खरे ठरवत इराणने इस्राईलवर हल्ला करीत २०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. अर्थात इस्राईलने या हल्ल्याचा यशस्वी बचाव केला. यात इस्राईलची म्हणावी तशी हानी झाली

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५


नसली तरी या हल्ल्याचा बदला घेतला जाईल असा इशारा इस्राईलने दिला आहे. याचाच अर्थ आगामी काळात इस्राईलकडून इराणवर हल्ला करण्यात येईल आणि जर तसे झाले तर हे युद्ध आणखी वाढू शकेल त्यात अमेरिकेने नेहमीप्रमाणे यात नाक खुपसले आणि इस्राईल पाठिंबा दिला. अमेरिकेने इस्राईलला पाठिंबा दिल्याने इराण आणखी खवळला कारण इराण इस्राईल प्रमाणे अमेरिकेलाही आपला शत्रू मानतो. अमेरिकेत सध्या निवडणुकीची लगबग चालू आहे. या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष पदासाठी उभे असलेले डोनाल्ड ट्रम्प यांनी तर इस्राईलला चिथावणी देत म्हंटले आहे की इस्राईलने इराणच्या आण्विक तळावर आणि तेलाच्या विहिरींवर हल्ला करावा. जर मी म्हणजे ट्रम्प जिंकून आलो तर इस्राईलच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून इराणला त्यांची जागा दाखवून देईल. उद्या जर डोनाल्ड ट्रम्प खरेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले तर हा संघर्ष आणखी वाढेल. अमेरिकेने आजवर प्रत्यक्ष युद्धात उतरून इस्राईलला साथ दिलेली नाही मात्र डोनाल्ड ट्रम्प जर निवडून आले तर ते इस्राईलच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानात उतरू शकतात आणि जर तसे झाले तर आजवर या युद्धात तटस्थ राहिलेले इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती हे अरब राष्ट्रे इराण ला साथ देण्यासाठी मैदानात उतरील आणि जर तसे झाले तर ती तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात ठरेल म्हणूनच हा संघर्ष आणखी वाढू न देण्याची खबरदारी जगाने घ्यावी.

# देवीच्या मारक रूपाची उपासना : काळाची आवश्यकता !

नवरात्र हा खरेतर मांगल्याचा आणि पावित्र्याचा उत्सव. स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा उत्सव, देवीच्या पराक्रमाची उपासना करण्याचा उत्सव. महिषासुराशी नऊ दिवस युद्ध करून नवव्या रात्री देवीने महिषासुराचा वध केला. या युद्धाचे प्रतीक म्हणून टिपऱ्या म्हणजेच दांडिया खेळल्या जातात. आजमितीला मात्र या उत्सवाला आलेले ग्लॅमरस स्वरूप उत्सवाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. चांगले नृत्य करता यावे म्हणून तरुणींसह तरुणही एक महिना अगोदरपासून नृत्याचे क्लासेस घेऊ लागले आहेत. पाठ उघडी ठेऊन त्यावर



रंगरंगोटी करण्याचे किळसवाणे फॅड गेल्या काही वर्षांपासून तरुणींमध्ये शिरले आहे. नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे, कपड्यांसह त्यांना मॅचिंग आभूषने परिधान करणे, साजेसा मेकअप करणे, गरबा नृत्य करताना अथवा दांडिया खेळताना इतरांपेक्षा वेगळे दिसण्याचा प्रयत्न करणे याकडेच महिलांचा अधिक कल दिसून येतो. एका राक्षसी प्रवृत्तीवर प्रकट स्त्रीशक्तीने युद्ध करून मिळवलेला विजय म्हणजे नवरात्रीचा उत्सव. या नऊ दिवसांत देवीने युद्ध करून क्षात्रतेजाच्या उपासनेचे महत्व पटवून दिले. स्त्री ही अबला नसून प्रसंगी अन्याय अत्याचाराचा कर्दनकाळ ठरू शकते हे देवीने स्वतः युद्ध करून दाखवून दिले. आज आपण नवरात्रीच्या काळात दांडिया किंवा टिपऱ्या खेळतो, हा खेळ नसून ते युद्धाचे प्रतीकात्मक स्वरूप आहे हेही आज अनेकांना माहित नाही.

आजमितीला स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना कमालीच्या वाढल्या आहेत. ३ वर्षाच्या बालिकेपासून वयोवृद्धाही आज सुरक्षित नाहीत. बदलापूर पाठोपाठ पुण्यातील घटनेने साऱ्या राज्याला हादरवून सोडले. दुसरीकडे लव्ह जिहादरूपी राक्षस हिंदू स्त्रियांना विविध आमिषे आणि प्रलोभने दाखवून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून हिंदूंचा वंशविच्छेद करू लागला आहे. राजकीय मंडळींना स्त्रियांच्या सुरक्षेपेक्षा राज्यात आपली सत्ता आणणे अधिक महत्वाचे वाटत असल्याने स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावले उचललीच जात नाहीत. अशा वेळी स्त्रियांनीच आपल्या सुरक्षेसाठी सज्ज झाले पाहिजे. समाजाची ढासळलेली नीतिमत्ता पाहता प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जाण्याची वेळ स्त्रियांवर कधीही येऊ शकते यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले शरीर आणि मन प्रतिकारक्षम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता स्त्रियांनी स्वरक्षणाचे प्रशिक्षण घेणे आज अत्यंत गरजेचे बनले आहे. कराटे, लाठीकाठी यांसह आपल्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या आधारे स्वतःचे रक्षण कसे करावे, प्रवासात स्वरक्षणासाठी कोणती साधने स्वतःसोबत बाळगावीत यांचे विनामूल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि संघटना आज गावोगावी आहेत. त्यांचा लाभ करून स्वतःतील आत्मबल वाढवूया. जेव्हा कधी आपल्यावर प्रतिकूल प्रसंग येईल तेव्हा आपले नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस, राजकीय मंडळी आपले रक्षण करण्यास वेळेत पोहोचतील याची शाश्वती नाही अशा वेळी समोरच्याशी दोन हात करून त्याला धडा शिकवायचा असेल तर तेव्हढी शारीरिक आणि मानसिक क्षमता आपल्यामध्ये असणे आज आवश्यक आहे. आपल्यासोबत आपल्या परिसरातील, कार्यालयातील स्त्रियांना सबला बनवण्याचे दायित्व आज स्त्रियांनीच घेण्याची वेळ आली आहे. स्त्रियांना कायद्याचेही संरक्षण असल्याने समाजातील वासनांध प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठी स्त्रियांनीच पुढे यायला हवे. आजच्या स्त्रियांसमोर आदर्श हवा आहे तो रणरागिणी झाशीच्या राणीचा, राजमाता जिजाबाईंचा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा. राणी चेन्नमांचा. स्त्रीशक्तीचा या प्रकट रूपाची उपासना करण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळे या नवरात्रीला नवरात्री उत्सवामागील भावार्थ समजून घेऊन दुर्गादेवीच्या मारक रूपाची उपासना करण्याचा संकल्प करा !




जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०


# शासनाची तत्परता महिलांची सुरक्षितता !

महिला व मुलींवर अत्याचाराच्या घटनांवर प्रतिबंध आणून सुरक्षिततेसाठी राज्य शासनाच्या गृह विभागाच्या माध्यमातून महिलांच्या सुरक्षेकरिता विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करीत आहे. राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये व पोलीस अधिक्षक स्तरावर, घटक प्रमुख स्तरावर महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच सर्व पोलीस ठाणे स्तरावर महिला पोलीस कक्षही स्थापन करण्यात आला आहे. याशिवाय महिला सुरक्षा समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

### महिलांच्या तक्रारी सोडविण्यासाठी हेल्पलाईन

महिलांनी तक्रार केल्यास तातडीने पोलीस मदत मिळणेसाठी १००, १०३, १०९१ क्रमांकांच्या हेल्पलाईन जारी करण्यात आल्या आहेत. मुंबई राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी हेल्पलाईन क्रमांकांची मदत होत आहे. या हेल्पलाईनमुळे आपत्कालीन परिस्थितीत महिलांना मदत मिळणे शक्य होत आहे.

### महिलांवरील अत्याचाराच्या जलद न्यायासाठी जलदगती न्यायालय

महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांसाठी न्यायदान प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये, ८६ जलदगती न्यायालये कार्यरत आहेत. अत्याचार व पोस्को कायद्यातंर्गत प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरित निकाली काढण्यासाठी २० पोस्को व १२ जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्यांतर्गत एक विशेष न्यायालयदेखील कार्यरत आहे.

### कम्युनिटी पोलिसींग उपक्रम

शाळा व महाविद्यालय परिसरात, गर्दी व निर्जनस्थळी 'दामिनी' पथकांद्वारे रस्ते गस्त, दुचाकी, चार चाकी वाहनांद्वारे पेट्रोलिंग करून गुन्ह्यांना प्रतिबंध केला जात आहे. कम्युनिटी पोलीसींग उपक्रमांतर्गत अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार रोखण्याकरिता 'पोलीस काका' तसेच 'पोलीस दिदी' नेमण्यात आले आहेत. निर्भया पथक, भरोसा सेल यासारखे उपक्रमही राबविण्यात येत आहे. महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी 'अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध समन्वय' कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. पीडित महिलांच्या समुपदेशनासाठी १२४ समुपदेशन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. तसेच डायल ११२ च्या माध्यमातून तातडीने मदत पुरविण्यात येत आहे.

### बलात्काराच्या गुन्ह्यांची निर्गती करण्याचे वाढते प्रमाण

बलात्काराच्या गुन्ह्यांची निर्गती करण्यासाठी आयटीएसएसओ (ITSSO) (Investigation Tracking System for Sexual Offences) पोर्टल कार्यान्वित आहे. या गुन्ह्यांची ६० दिवसात निर्गती करण्याचे प्रमाण वाढले आहे. सन २०२० मध्ये गुन्ह्यांची निर्गती करण्याचे प्रमाण ४५.५ टक्के इतके होते, तर सन २०२१ मध्ये ५७.८, सन २०२२ मध्ये ७३.०२ व सन २०२३ मध्ये ९१.०१ टक्क्यापर्यंत वाढले आहे. सन २०२४ मध्ये २४ जून २०२४ पर्यंत ९२ टक्के निर्गती करण्याचे प्रमाण आहे. या गुन्ह्यांमध्ये अधिक निर्गती होण्याच्यादृष्टीने या कामाचा वरिष्ठ स्तरावरून नियमित आढावाही घेण्यात येतो. या पोर्टलद्वारे बलात्कार गुन्ह्यांची तपासाची सद्यस्थिती समजते. तपास विहीत वेळेत पूर्ण करणेबाबत उपयुक्त मार्गदर्शन व निरीक्षण करण्यास मदत होते. ही प्रणाली सीसीटीएनएस या कार्यप्रणालीशी जोडल्यामुळे सर्व पोलीस ठाणे एका प्रणालीमध्ये आले आहे.

### मुंबई शहर सुरक्षा प्रकल्प

सार्वजनिक ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांवर परिणामकारकरीत्या आळा घालण्याच्या दृष्टीने व त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी 'मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना' (निर्भया) राबविण्यात येत आहे. या योजनेच्या निधीमध्ये केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा ६० आणि ४० टक्के असा आहे. या योजनेच्या अंमलबजावणीस केंद्र शासनाने ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. योजनेकरीता पोलीस आयुक्त, मुंबई हे अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कार्य करीत आहे.

या योजनेंतर्गत गर्दी व संवेदनशील ठिकाण, मागोवा व निराकरण, समाज माध्यमांचा दुरूपयोग करणाऱ्यांचा शोध घेणे, सायबर न्यायवैद्यक व मोबाईल डाटा टर्मिनल विकसित करण्यात येत आहे.

पोलीस दिदी व महिला सुरक्षाविषयक जनजागृती करण्यात येत आहे. मदत व पुनर्विलोकन कक्ष, प्रतिसाद वाहने यांची खरेदीही करण्यात येत आहे.

### बेपत्ता मुलींच्या शोधासाठी ऑपरेशन मुस्कान

शहरात बेपत्ता झालेल्या मुलींची माहिती प्राप्त होताच तात्काळ दखल घेऊन त्वरित प्रभावाने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी ऑपरेशन मुस्कान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून सन २०२३ मध्ये १४४० मुले / मुलींचा शोध घेण्यात आला आहे. बेपत्ता मुलींच्या शोधासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये 'मिसींग पथक' नेमण्यात आले आहे. तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा यांच्याद्वारे बेपत्ता व्यक्तींचा शोध घेतला जात आहे.

### महिला अत्याचार प्रतिबंध शाखेची स्थापना

मुंबई शहरात महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंबधी गुन्ह्यांचा तपास लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात पोलीस उप-आयुक्त यांच्या अधिपत्याखाली महिला अत्याचार प्रतिबंधक शाखेची स्थापना करण्यात आली आहे. या शाखेत गुन्ह्यांनुसार दोन युनिट आहे. युनीट एक मध्ये बलात्कार, अपहरण, विनयभंगाचे प्रकार आणि महिलांवरील इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे, युनीट दोनमध्ये हुंडाबळी, हुंडाबळी संबंधीत गुन्ह्यांशी निगडीत आत्महत्या, हुंडा प्रतिबंधक कायद्या अंतर्गत उद्भवणारे इतर गुन्हे, कौटुंबिक हिंसाचार व हुंड्याशी निगडीत इतर गुन्ह्यांचा समावेश आहे.


निलेश तायडे,
विभागीय संपर्क अधिकारी
अकोला


## अशोकायन...

**प्रथम तुम्हा वंदीतो..!**

कार्यारंभी गणरायाची करता
मनोभावे आराधना
विघ्ने येती पण जाती लयास
पूर्ण होती मनोकामना... !
शक्तिदायनी जगदंबा
विघ्नहर्ता श्री गणेश
पाठीशी असता...
चिंता करू नको नरेश !
श्रद्धा असावी पक्की
संकटी होऊ नये डळमळीत
अग्नीपरीक्षे विना भौ...
तो देईल कसे झोळीत... !




प्रा.अशोक सारडा मेहकर
(९४२२३९४३३९)


# आधार कार्ड: ओळख, सुरक्षा आणि चौदा वर्षांचा विश्वासाचा सेतू

महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यातील टेंभली हे भारतातील पहिले आधार गाव म्हणून ओळखले जाते. याच गावाने देशाच्या डिजिटल प्रवासाचा आरंभ केला, जेव्हा १४ वर्षांपूर्वी, रंजना सोनावणे या महिलेला पहिलं आधार कार्ड देण्यात आलं आणि आधारचा प्रवास अधिकृतपणे सुरू झाला. भारताच्या विशिष्ट ओळख प्राधिकरण ने टेंभली गावातून आधार योजना सुरू केली, ज्यामुळे देशाच्या डिजिटल ओळख व्यवस्थेत एक नवा अध्याय सुरू झाला. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि संयुक्त पुरोगामी आघाडीच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या उपस्थितीत या योजनेचा शुभारंभ झाला. या ऐतिहासिक प्रसंगी १० जणांना त्यांचा विशिष्ट ओळख क्रमांक प्रदान करण्यात आला, आणि त्यापैकी रंजना सोनावणे ह्या पहिल्या लाभार्थी होत्या.

आज, आधार कार्ड महिला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रंजना सोनावणे यांच्या ओळखीमुळे टेंभली गावाचे नाव देशाच्या इतिहासात अजरामर झाले आहे. नंदुरबार शहरापासून ४३ किलोमीटर अंतरावर असलेले हे छोटेसे गाव आता आधारच्या प्रवासातील पहिले पाऊल म्हणून स्मरणात आहे.

### आधारचा महत्त्वाचा वापर : १४ वर्षांचा प्रवास

आधार हा १२ अंकी विशिष्ट ओळख क्रमांक आहे, ज्याचा वापर सरकारी सेवा, आर्थिक व्यवहार, आणि वैयक्तिक ओळख यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो. सरकारी योजनांमध्ये लाभार्थींना थेट लाभ हस्तांतरण, बँक खाते उघडणे, पासपोर्ट, पॅन कार्ड अर्ज, आणि मोबाईल सिम सक्रियता यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आधारचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.

याशिवाय, कर्ज अर्ज, विमा पॉलिसी घेणे, मालमत्ता नोंदणी, शाळा प्रवेश, आणि रुग्णालय नोंदणी यांसारख्या सेवांमध्येही आधारचा वापर व्यापक प्रमाणात केला जातो. विविध सरकारी योजनांच्या पारदर्शकतेसाठी आधारने भ्रष्टाचार आणि चुकीच्या लाभार्थ्यांवरही अंकुश आणला आहे.

### आव्हाने आणि भविष्य

आधारच्या प्रारंभिक काळात डेटा सुरक्षितता आणि गोपनीयतेच्या समस्या होत्या. मात्र, २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आधारला कायदेशीर मान्यता दिली, जरी खाजगी कंपन्यांकडून आधारचा वापर मर्यादित करण्यात आला.

आज, १४ वर्षांनंतर, आधारने लाखो भारतीयांना कायदेशीर ओळख दिली आहे आणि सरकारी व आर्थिक सेवांमध्ये प्रवेश सुलभ केला आहे. भारताच्या डिजिटल प्रवासातील आधार हा एक महत्त्वाचा दुवा ठरला आहे.

आधारचा पुढील प्रवास अधिक सशक्त आणि सुरक्षित भारताच्या दिशेने असेल, आणि टेंभली गाव, जिथे या क्रांतीची सुरुवात झाली, तो इतिहासात कायमच एक प्रेरणादायी ठिकाण म्हणून ओळखले जाईल.

# जीवनात शांति कशी प्राप्त करावी

संत राजिन्दर सिंह जी महाराज



२ ऑक्टोबर महात्मा गांधींच्या जन्मदिवशी संपूर्ण विश्वभरात अहिंसा दिवस साजरा केला जातो. आपण सगळे जाणतो कि गांधीजींनी अहिंसेद्वारे भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. ते नेहमी म्हणत असत, जर आपणास आपल्या जीवनात शांति असावी असे वाटत असेल तर, आपणास त्याकरिता अहिंसेला मन, वचन आणि कृतीद्वारे आपल्या जीवनात उतरविले पाहिजे. तेव्हाच आपल्या जीवनातच नव्हे तर पूर्ण विश्वात शांति स्थापनेचे स्वप्न साकार करू शकू.

आता प्रश्न असा निर्माण होतो की आपण आपल्या जीवनात किंवा विश्वभरात शांति स्थापने करता काय करतो? या विषयी माझे एक स्पष्ट मत आहे की, आपल्याला आश्चर्य वाटेल की या विषयाला आपण आतापर्यंत दुर्लक्षित कसे केले? विश्वात शांति स्थापनेसाठी सर्वांत प्रथम पाया आपण स्वतःच आहोत.

जर आपण ध्यान अभ्यासाद्वारे आंतरिक शांति प्राप्त केली तर आपल्याला आत्मिक प्रसन्नता अनुभवायला मिळेल. त्या आत्मिक शांति आणि आनंदाला प्राप्त केल्यानंतर सर्वात प्रथम आपण आपला परिवार आणि आपल्या सभोवतालच्या लोकांना शांत करण्यात सहाय्यभूत ठरू. त्यानंतर ही शांतिची व्याप्ती हळूहळू समाज आणि राष्ट्र यांच्यातून विश्वभरात प्रसारित होईल. या प्रकारे आपण एक-एक करुन ही साखळी जोडून विश्वात शांति ची स्थापना करू शकू.

मनो-वैज्ञानिकांच्या मते समजाविले जाते की, कोणत्याही माणसाला दुसऱ्या कोणी माणसाने शिकवावं की त्याच्या करिता योग्य काय आहे? हे सांगितलेलं आवडत नाही. जर कोणी एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला बदलण्याचा प्रयत्न करत असेल तर ती व्यक्ती त्याचा विरोध करते. इतरांना हे सांगणं पुरेसं नाही की त्यांनी शांतिने जगावे. जर आपण इच्छित असू, आपल्या बोलण्याचा प्रभाव इतरांवर व्हावा, तर आपल्याला ते आपल्या जीवनात प्रथम उतरविले पाहिजे. जर आपण ध्यान-अभ्यासाद्वारे आपल्या अंतरी शांति प्राप्त केली तर यामुळे आपले जीवन बदलून जाईल. आपण नेहमी शांत आणि प्रसन्न चित्त राहू, यामुळे इतर व्यक्ती सुद्धा जिज्ञासेने हे जाणण्याचा प्रयत्न करतील या खुशी चे रहस्य काय आहे? याच बरोबर हे सुद्धा जाणून घेण्याचा प्रयत्न करतील की ही खुशी आणि शांति आपण कशाप्रकारे प्राप्त केली.

चला तर, आपण सुद्धा ध्यानाभ्यासाद्वारे आपल्या अंतरी शांतिचा दीपक प्रज्वलित करूया. ज्याचा प्रकाश इतरांना सुद्धा प्रकाशित करेल, जेणेकरून त्यांचे जीवन सुद्धा शांति आणि प्रकाशाने ओतप्रोत होईल, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने अहिंसा दिवस साजरा करू शकू.

# चलो मोबिलिटीने आपली बसमधील अडथळ्यांना संबोधित केले, क्रू स्ट्राइक दरम्यान

**नागपूर, ६ ऑक्टोबर २०२४:** सध्याच्या मानकांनुसार वेतन सुधारणांच्या मागणीसाठी आपली बस क्रू मेंबर्स संपावर गेल्याने संपूर्ण नागपुरातील सार्वजनिक वाहतूक सेवेवर परिणाम झाला आहे. या व्यत्ययाचा परिणाम अनेक नागरिकांवर झाला आहे, विशेषत: दैनंदिन प्रवासी आणि विद्यार्थी जे शहरात नेव्हिगेट करण्यासाठी या अत्यावश्यक आणि परवडणाऱ्या सेवांवर अवलंबून आहेत. या आव्हानांना प्रतिसाद म्हणून, चलो मोबिलिटी या परिवहन तंत्रज्ञान कंपनीने डिजिटायझेशनच्या माध्यमातून आपली बस सिस्टीम वाढवत एक निवेदन जारी केले आहे. कंपनी समुदायाला भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या अडचणी मान्य करते आणि क्रूच्या वेतन सुधारणांच्या गरजेबद्दल सहानुभूती दाखवते. बसेसचे डिजिटायझेशन आणि व्यवस्थापन त्याच्या कार्यक्षेत्रात असताना, कंपनीने स्पष्ट केले की चालक दलाच्या वेतनाबाबतचे निर्णय तिच्या अधिकाराबाहेर आहेत.

या आव्हानात्मक काळात शहराच्या वाहतूक गरजा पूर्ण करण्यासाठी समर्पित आहे. गेल्या दोन दिवसांत, कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी शक्य तितक्या बसेस चालविण्यासाठी चोवीस तास अथक परिश्रम घेतले आहेत, प्रवाशांवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी आणि अत्यावश्यक सेवा कायम ठेवल्या जातील याची खात्री करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मे मध्ये करार स्वीकारल्यापासून, चलो मोबिलिटीने शहराच्या संपूर्ण बस फ्लीटचे डिजिटायझेशन करण्यामध्ये लक्षणीय प्रगती केली आहे, परिणामी ऑपरेशनल कार्यक्षमता सुधारली आहे. यामुळे प्रवाशांच्या वापरकर्त्यांच्या अनुभवात लक्षणीय सुधारणा झाली आहे. नागपूरने इतर शहरांच्या तुलनेत डिजिटल तिकिटाचा सर्वात जलद अवलंब केला आहे आणि सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीत लक्षणीय २५% प्रवाशांनी कॅशलेस प्रवासाकडे वळले आहे. हे नागपूरच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर तंत्रज्ञान-आधारित दृष्टिकोनाचा सकारात्मक प्रभाव अधोरेखित करते. चलो मोबिलिटी सध्या सुरू असलेल्या वेतनाशी संबंधित समस्यांसाठी जबाबदार नसली तरी, बस क्रू आणि संपामुळे बाधित प्रवासी या दोघांना भेडसावणाऱ्या आव्हानांची ती तीव्रतेने जाणीव ठेवते.

## 'एसटी' प्रवर्गातून धनगर समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे

**मुंबई, ६ ऑक्टोबर:** राज्यातील धनगर समाज हा अजूनही मुख्य प्रवाहापासून वंचित असल्याने त्यांना अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून आरक्षण देणे ही काळाची गरज आहे. राज्य सरकारने या अनुषंगाने पावले उचलली आहेत.परंतु, यानिमित्ताने धनगर विरूद्ध आदिवासी असा संघर्ष पेटवला जात आहे.काही तथाकथित नेत्यांनी मंत्रालयात केलेल्या 'स्टंटबाजी'ला धनगर समाज भीक घालत नाही, अशा कठोर शब्दात ओबीसी नेते आणि इंडिया अगेन्स्ट करप्शनचे (आयएसी) राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी अविवेकी लोकप्रतिनिधींचा समाचार घेतला.

आमदारांची ही कृती म्हणजे केवळ दिखावा आहे. उलटपक्षी धनगर समाज हा आतापर्यंत एसटी आरक्षणापासून वंचित असल्याने या आंदोलक लोकप्रतिनिधींनी मोठ्या मनाने धनगर समाजाचे स्वागत करायला हवे होते, असं मत देखील पाटील यांनी व्यक्त केले. आमदारांच्या या अविवेकी वर्तनामुळे धनगर विरुद्ध आदिवासी असा संघर्ष पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. समाजासाठी केवळ स्टंटबाजी करून चालत नाही, संघर्ष करण्याची वृत्ती हवी. मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून उड्या घेणाऱ्या या आंदोलकांमध्ये ही वृत्ती दिसत नाही.केवळ दबाब निर्माण करण्यासाठी असले देखावे करून आंदोलन आणि जनहिताचे कार्य पुर्णत्वास जात नाही, अशा शब्दात हेमंत पाटील यांनी आंदोलकांची कानउघाडणी केली.राज्य सरकारवर अशाप्रकारचा दबाब निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असले तर धनगर बांधव ही गप्प बसणार नाही, असा इशाराच त्यांनी यानिमित्ताने दिला.

# जागतिक दंतचिकित्सक दिनी एआय-संचालित व्यक्तिगत व्हिडिओजसह सेन्सोडाईनने दंत चिकित्सकांच्या भूमिकेचा गौरव

**मुंबई, ६ ऑक्टोबर:** हेलेऑन (पूर्वीची ग्लॅक्सोस्मिथक्लाईन कन्झ्युमर हेल्थकेअर) यांचा आघाडीचा मौखिक देखभाल ब्रँड असलेल्या सेन्सोडाईनने देशभरातील दंतचिकित्सकांचे व्यक्तिगत व्हिडिओज बनवण्यासाठी एआय सामर्थ्याचा उपयोग करून एक नावीन्यपूर्ण डिजिटल अभियान सुरू केले आहे. या व्हिडिओजमध्ये लोकांचे मौखिक स्वास्थ्य सुधारण्यातील आणि अशाप्रकारे त्यांचे दैनंदिन जीवन आनंददायी बनवण्यातील त्यांची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे.

या एआय अभियानात दंतचिकीत्सकांचे ४००० कस्टमाइझ्ड व्हिडिओज बनवणे सामील आहे, ज्याचा उद्देश दंतचिकीत्सकांना डॉक्टर्स ऑफ जॉय म्हणून स्थापित करण्याचा आहे. कोणत्याही मौखिक आरोग्य समस्येच्या तक्रारीशिवाय आनंदी क्षण उपभोगण्यासाठी लोकांना सक्षम करून आनंद पसरवण्यातील दंतचिकीत्सकांच्या भूमिकेबद्दल या व्यक्तिगत व्हिडिओजमधून कृतज्ञता व्यक्त करण्यात येईल. हे व्हिडिओज विविध शहरांत शेअर करण्यात येतील आणि लोकांच्या जीवनातील दंतचिकीत्सकांची भूमिका अधोरेखित करण्यासाठीचे ते एक दमदार माध्यम ठरेल.

यूट्यूबसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सवरून या सुजाण कृतीचा प्रचार करण्यात येईल आणि पद्धतशीरपणे ८०० मुख्य पिनकोड भागांमध्ये त्यांचे वितरण करण्यात येईल, ज्यामुळे मेट्रो, टियर १ आणि टियर २ शहरांतील ३८ मिलियन पेक्षा जास्त लोकांपर्यंत ते व्हिडिओ पोहोचतील. हेलेऑन येथील कॅटेगरी लीड ओरल हेल्थकेअर किशले सेठ म्हणाले, सेन्सोडाईनमध्ये आम्ही जाणतो की, लोकांना अधिक निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी मदत करण्यात दंतचिकित्सकांची किती महत्त्वाची भूमिका असते. या जागतिक दंतचिकीत्सक दिनी आम्हाला दंतचिकीत्सकांच्या निष्ठेचा गौरव करायचा होता आणि लोकांना जो आनंद ते देतात त्याबद्दल मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करायची होती.

# किया EV9 इलेक्ट्रिक SUV भारतात लॉन्च



**नवी दिल्ली, ६ ऑक्टोबर २०२४:** किया मोटर्सने ३ ऑक्टोबरला भारतात आपली फ्लॅगशिप इलेक्ट्रिक EV9 लॉन्च केली आहे. पूर्ण चार्ज केल्यावर ही कार ५४१ किमी पेक्षा जास्त धावेल असा कंपनीचा दावा आहे. ही कार हायवे ड्रायव्हिंग पायलट (एचडीपी) सिस्टीम सारख्या उच्च-स्तरीय वैशिष्ट्यांनी सुसज्ज आहे. याशिवाय सुरक्षेसाठी यात ९ एअरबॅग आणि ३६०-डिग्रीकॅमेरा आणि लेव्हल-2ADAS सारखे फीचर्स देण्यात आले आहेत. कंपनीने कार फक्त ट्रिममध्ये ६सीटर लेआउटसह सादर केली आहे. तिची ७ सीटर आवृत्ती नंतर लॉन्च केली जाईल. तिची किंमत १.३० कोटी रुपये (परिचयात्मक, एक्स-शोरूम संपूर्ण भारत) ठेवण्यात आली आहे. ही कियाची भारतातील आतापर्यंतची सर्वात महागडी इलेक्ट्रिक कार आहे, जी येथे पूर्णपणे तयार केलेली युनिट म्हणून आयात केली जाईल आणि विकली जाईल. किया EV9 ची भारतातील मर्सिडीज EQE SUV, BMWiX आणि Audi Q8 e-tron स्पर्धा करेल. **बाह्य डिझाइन:** डिजिटल पॅटर्न लाइटिंग ग्रिल किया EV9 च्या पुढील भागात आधुनिक लाइटिंग एलिमेंट्स देण्यात आले आहेत. यात लहान क्यूब लॅम्प्सचे ड्युअल क्लस्टर्स, डिजिटल पॅटर्न लाइटिंग ग्रिल, व्हर्टिकल हेडलॅम्प्स आणि सिग्नेचर 'डिजिटल टायगर फेस' आणि 'स्टार मॅप' आहेत. कंपनीने त्याचे नाव स्टार मॅप डीआरएल ठेवले आहे. टॅपर्ड रूफ लाइन आणि बाजूला १९ इंच अलॉय व्हील उपलब्ध असतील. मागील बाजूस, उभ्या स्टॅक केलेल्या एलईडी टेललाइट आणि सिल्व्हर स्किड प्लेटसह एक काळा बंपर प्रदान केला आहे. कारचा एकूण लुक बॉक्सी आणि एसयूव्ही बॉडी शेप आहे.

# कॉमेडीचा स्पेशल तडका!

**मुंबई, ६ ऑक्टोबर:** एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है'च्या आगामी एपिसोड्समध्ये प्रेक्षकांना कॉमेडी व मनोरंजनाचा खास आनंद मिळणार आहे. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत दरोगा हप्पू सिंग ऊर्फ योगेश त्रिपाठी म्हणाले, ''हप्पू आणि बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) यांना व्हिटॅमिन डी च्या कमतरतेमुळे शरीरात ऊर्जा कमी असल्यासारखे जाणवते. ज्यामुळे त्यांना अस्वस्थ वाटते आणि कोणत्याही गोष्टींचा आनंद घेण्यामध्ये मन लागत नाही. ते त्यांच्या आरोग्याबाबतच्या समस्या लपवून ठेवण्याचा आणि समस्येचे निराकरण करण्यासाठी व्हिटॅमिन डी गोळ्या सेवन करण्याचे ठरवतात. पण, राजेश (गीतांजली मिश्रा) आणि बिमलेश (सपना सिकरवार) यांना त्यांच्या वर्तणूकीमध्ये झालेला बदल दिसून येतो. त्या हप्पू व बेनीचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात, पण दोघांना त्यांच्यामध्ये कोणताच रस लागत नाही. राजेश आणि बिमलेश हप्पू व बेनीचा पाठलाग करण्याचे ठरवतात. त्यांना संशय येतो की, त्यांचे विवाहबाह्य संबंध आहेत. ते हप्पू व बेनीवर नजर ठेवण्यासाठी डिटेक्टिव्ह्ज देखील नियुक्त करतात. कटोरी अम्मा (हिमानी शिवपुरी) राजेशचे डिटेक्टिव्हसोबतचा संवाद ऐकते आणि राजेशचे त्याच्यासोबत प्रेमप्रकरण असल्याचा संशय घेते. यामुळे चिंतित व तणावग्रस्त कटोरी अम्मा हप्पूला सर्वकाही सांगते, जो दक्ष होत बेनीला सांगण्यासाठी जातो. हप्पू व बेनीला वाटते की त्यांच्या पत्नी विश्वासघातकी आहेत. गैरसमजांच्या या जाळ्यामुळे ते एकमेकांपासून वेगळे होतील की सत्य समोर येऊन त्यांचे नाते वाचेल?'' मालिका 'भाबीजी घर पर है'च्या आगामी एपिसोडबाबत विभुती नारायण मिश्रा



ऊर्फ आसिफ शेख म्हणाले, ''संपूर्ण शहरात रहस्यमय व्यक्ती चमडी उधेडू पुरूषांवर हल्ला करत असल्याची बातमी पसरते. दरम्यान, विभुती (आसिफ शेख) व डेव्हिड चाचा (अनुप उपाध्याय) यांनी कर्ज घेतल्याचे समजल्यानंतर अनिता (विदिशा श्रीवास्तव) त्यांच्यावर नाराज व रागावलेली आहे. ती रागाच्या भरात त्यांना घरापासून काढते, ज्यामुळे त्यांना घराबाहेर झोपावे लागते. दुर्दैवाने, चमडी उधेडूला ते सापडतात आणि त्याना बेदम मारहाण करतो. दुसरीकडे, नेहमी आज्ञेचे पालन करणारी व चांगलेपणाने वागणारी अंगूरी (शुभांगी अत्रे) तिवारी (रोहिताश्व गौड) सतत अपमान करत असल्यामुळे नाराज होते. अनिता आणि अम्माजी (सोमा राठोड) तिला चांगलेपणाने न वागण्याचा आणि तिवारीला तिची कणखर बाजू दाखवण्याचा सल्ला देतात, ज्यामुळे तो तिचे कौतुक करू लागेल. त्यांचा सल्ला घेत अंगूरी आपली वागणूक बदलते.

# सोनी सबवरील वागले की दुनियामध्ये किट्टूचा रहस्यमय मित्र भूत निघाला!

**मुंबई, ६ ऑक्टोबर:** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत वागले कुटुंबियांचा दैनंदिन संघर्ष आणि यशापयश यांचे हृद्य चित्रण बघायला मिळते. अलीकडच्या भागांमध्ये, यामिनी (मानसी जोशी)ची आई आणि भाऊ कोणत्याशा मालमत्तेच्या कागदपत्रांवर तिची सही घेण्यासाठी साईदर्शन सोसायटीत येतात.वास्तविक किट्टू (माही सोनी) दत्तक घेतलेली मुलगी असल्यामुळे त्यांची नावडती आहे आणि यामिनीच्या मालमत्तेत तिला वाटा मिळू नये हा त्यांच्या इथे येण्यामागचा सूप्त हेतू आहे. आगामी भागांमध्ये गोष्टीला एक वेगळेच वळण मिळते, जेव्हा किट्टूचा एक रहस्यमय मित्र अवतरतो. तो आल्यानंतर चमत्कारिक गोष्टी घडू लागतात आणि सर्व जण कोड्यात पडतात. हा मित्र फक्त किट्टूलाच दिसतो आणि तो टोपीशी खेळ करतो, इकडे तिकडे टोपी उडवतो आणि अथर्वचा (शीहान कपाही) मिल्कशेक देखील पळवतो. पुढे हा धक्कादायक खुलासा होतो की, किट्टूचा हा मित्र म्हणजे एक भूतच आहे, जो तिच्या काका आणि आजीपासून तिचे रक्षण करत आहे आणि यामिनीने मालमत्तेच्या कागदपत्रांवर सही करू नये याचाही प्रयत्न करत आहे. मित्राच्या रुपातले हे भूत त्याच्या मिशनमध्ये यशस्वी होणार का हे बघण्यासाठी प्रेक्षकांना थोडी प्रतीक्षा करावी लागेल.

वागले की दुनिया मालिकेत राजेशची भूमिका करत असलेला सुमित राघवन म्हणतो, ही गोष्ट विशेष आकर्षक आहे, कारण आपण नेहमी एकाच साच्यातील भूत बघतो.वागले की दुनिया मालिकेतील हे भूत मात्र अभद्र नसून संरक्षक आणि प्रेमळ आहे. भुताच्या उपस्थितीमुळे या कथानकाला एक रहस्यमयतेचा स्तर मिळाला आहे आणि कौटुंबिक नात्यासारख्या भावनिक मुद्द्याला ही कथा हात घालते. कथा बघताना आपल्याला जाणीव होते की, प्रेम आणि संरक्षण कोणत्याही अनपेक्षित मार्गाने येऊ शकते!

# अपडेटेड सिट्रोएन एअरक्रॉस लाँच, किंमत रु. ८.४९ लाख

**६ एअरबॅग्ज आणि ऑटोमॅटिक एसीसारखी वैशिष्ट्ये, ह्युदाई क्रेटाशी स्पर्धा**

**नवी दिल्ली, ६ ऑक्टोंबर:** सिट्रोएन इंडियाने आज (३० सप्टेंबर) भारतीय बाजारपेठेत सिट्रोएन C3 एअरक्रॉसची अद्ययावत आवृत्ती लाँच केली आहे. कंपनीने ही कार Aircross SUV नावाने सादर केली आहे. हे नुकतेच बेसाल्ट एसयूव्ही कूपच्या लॉन्च इव्हेंटमध्ये प्रदर्शित करण्यात आले. अद्ययावत एसयूव्हीमध्ये एलईडी प्रोजेक्टर हेडलाइट्स, ६ एअरबॅग्ज आणि ऑटोमॅटिक एसी यांसारख्या वैशिष्ट्यांसह सुधारणा करण्यात आली आहे. याशिवाय कंपनीने कारमध्ये नवीन नॅचरली एस्पिरेटेड पेट्रोल इंजिनचा पर्यायही दिला आहे.



सुरुवातीची किंमत ८.४९ लाख रुपये, ८ ऑक्टोबरपासून वितरण

कार ५ सीटर आणि ७ सीटर पर्यायांसह येते. त्याची सुरुवातीची किंमत ८.४९ लाख रुपये (एक्स-शोरूम, पॅन-इंडिया) ठेवण्यात आली आहे, जी टॉप व्हेरियंटमध्ये १४.३५ लाख रुपये (एक्सशोरूम, पॅन-इंडिया) पर्यंत जाते. इच्छुक ग्राहक ऑनलाइन किंवा त्यांच्या जवळच्या डीलरशिपला भेट देऊन एसयूव्ही बुक करू शकतात. Citroen 8 ऑक्टोबरपासून Aircross SUV - ची डिलिव्हरी सुरू करेल. सेगमेंटमध्ये, ते Hyundai Creta, Honda Elevate, Kia Seltos, Volkswagen Taigun, Skoda Kushaq आणि Maruti Grand Vitara यांच्याशी स्पर्धा करते. महिंद्र स्कॉर्पिओ क्लासिकसाठी ७ सीटर एअरक्रॉस हादेखील चांगला पर्याय असू शकतो.

# प्रवीण हिंगोनिया यांच्या नवरस कथा कोलाज या चित्रपटाच्या टीमने काश्मीर ते कन्याकुमारी या प्रवासात नागपूरला पोहोचल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला

**नागपूर, ६ ऑक्टोबर,** अभिनेता दिग्दर्शक प्रवीण हिंगोनिया यांच्या नवरस कथा कोलाज या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी पिक्चरची टीम काश्मीर ते कन्याकुमारी या रस्त्याने प्रवास करत आहे. या संदर्भात टीम महाराष्ट्रातील नागपूर येथे पोहोचली आणि तेथे पत्रकार परिषदेत पत्रकारांची भेट घेतली. अभिनेता दिग्दर्शक प्रवीण हिंगोनिया सांगतात की, बॉलीवूडच्या इतिहासात असं कधीच घडलं नाही की चित्रपटाच्या प्रमोशनसाठी संपूर्ण टीमने काश्मीर ते कन्याकुमारी असा रस्त्याने प्रवास केला असेल, पण नवरस कथा कोलाजने हे केलं आहे. वाघा बॉर्डर, सुवर्ण मंदिर, जालियनवाला बाग, खतकर कलान, शहीद-ए-आझम भगतसिंग यांचे गाव, लखनौ, ताजमहाल, इंदूर, मुंबईसह संपूर्ण देशाचा दौरा करून चित्रपटाची टीम नागपुरात पोहोचली आहे. निर्माते प्रवीण हिंगोनिया आणि पटेल यांनी देशभरातील या प्रमोशनल टूरद्वारे चित्रपट आधीच प्रसिद्धीच्या झोतात आणला आहे. या चित्रपटाने ५८ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकले असून १८ ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटासाठी आम्ही भारतभर फिरलो, असे निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते प्रवीण हिंगोनिया यांनी सांगितले. देशवासीयांकडून आम्हाला जे प्रेम मिळत आहे ते आम्ही शब्दात व्यक्त करू शकत नाही. आम्ही जिथे गेलो तिथे लोकांनी भरभरून सहकार्य केले आणि आता हा ताफा वाढत आहे. हा चित्रपट देशातील माती, संस्कृती आणि सभ्यतेशी संबंधित आहे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांपासून प्रेरित असलेल्या कथेचा भाग बनण्यासाठी कलाकार खूप उत्सुक आहेत.

# जीवनात शांति कशी प्राप्त करावी


आज २ ऑक्टोबर महात्मा गांधींच्या जन्मदिवशी संपूर्ण विश्वभरात अहिंसा दिवस साजरा केला जात आहे. आपण सगळे जाणतो कि गांधीजींनी अहिंसेद्वारे भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. ते नेहमी म्हणत असत, जर आपणास आपल्या जीवनात शांति असावी असे वाटत असेल तर, आपणास त्याकरिता अहिंसेला मन, वचन आणि कृतीद्वारे आपल्या जीवनात उतरविले पाहिजे. तेव्हाच आपल्या जीवनातच नव्हे तर पूर्ण विश्वात शांति स्थापनेचे स्वप्न साकार करू शकू. आता प्रश्न असा निर्माण होतो की आपण आपल्या जीवनात किंवा विश्वभरात शांति स्थापने करता काय करतो? या विषयी माझे एक स्पष्ट मत आहे की, आपल्याला आश्चर्य वाटेल की या विषयाला आपण आतापर्यंत दुर्लक्षित कसे केले? विश्वात शांति स्थापनेसाठी सर्वांत प्रथम पाया आपण स्वतःच आहोत. जर आपण ध्यान अभ्यासाद्वारे आंतरिक शांति प्राप्त केली तर आपल्याला आत्मिक प्रसन्नता अनुभवायला मिळेल. त्या आत्मिक शांति आणि आनंदाला प्राप्त केल्यानंतर सर्वात प्रथम आपण आपला परिवार आणि आपल्या सभोवतालच्या लोकांना शांत करण्यात सहाय्यभूत ठरू. त्यानंतर ही शांतिची व्याप्ती हळूहळू समाज आणि राष्ट्र यांच्यातून विश्वभरात प्रसारित होईल.



संत
राजिन्दर सिंह जी महाराज

या प्रकारे आपण एक-एककरुन ही साखळी जोडून विश्वात शांति ची स्थापना करू शकू. मनो-वैज्ञानिकांच्या मते समजाविले जाते की, कोणत्याही माणसाला दुसऱ्या कोणी माणसाने शिकवावं की त्याच्या करिता योग्य काय आहे? हे सांगितलेलं आवडत नाही. जर कोणी एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला बदलण्याचा प्रयत्न करत असेल तर ती व्यक्ती त्याचा विरोध करते. इतरांना हे सांगणं पुरेसं नाही की त्यांनी शांतिने जगावे. जर आपण इच्छित असू, आपल्या बोलण्याचा प्रभाव इतरांवर व्हावा, तर आपल्याला ते आपल्या जीवनात प्रथम उतरविले पाहिजे. जर आपण ध्यान-अभ्यासाद्वारे आपल्या अंतरी शांति प्राप्त केली तर यामुळे आपले जीवन बदलून जाईल. आपण नेहमी शांत आणि प्रसन्न चित्त राहू, यामुळे इतर व्यक्ती सुद्धा जिज्ञासेने हे जाणण्याचा प्रयत्न करतील या खुशी चे रहस्य काय आहे? याच बरोबर हे सुद्धा जाणून घेण्याचा प्रयत्न करतील की ही खुशी आणि शांति आपण कशाप्रकारे प्राप्त केली. चला तर, आपण सुद्धा ध्यानाभ्यासाद्वारे आपल्या अंतरी शांतिचा दीपक प्रज्वलित करूया. ज्याचा प्रकाश इतरांना सुद्धा प्रकाशित करेल, जेणेकरून त्यांचे जीवन सुद्धा शांति आणि प्रकाशाने ओतप्रोत होईल, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने अहिंसा दिवस साजरा करू शकू.

# शब्दकोडे क्रमांक १९४६




**आडवे शब्द :-**
१) मत देण्याचे काम
४) कापडी नाडी
६) लाकूड
७) गगन
११) रुग्णालय
१३) सूट
१४) कडक
१५) वाळवी
१७) मोठे माकड
१९) श्रीकृष्णाच्या वडिलांचे नाव
२१) फळाचे साल
२४) मातीचा कण
२६) गार पाण्याचे मडके
२७) आणि
२८) मोठा नगारा, प्रसिद्धी, नौबत
२९) अभिप्राय
३१) स्वच्छंदी
३६) सोने
३८) करंजी, मोदकाचे आवरण
३९) वितरण
४१) पंजाबमधील एक नदी
४३) काटकसर
४६) बाण
४७) संगीतातील ठेका
४८) राजाचे निवासस्थान
५०) सरसकट
५३) हिस्सा
५४) प्रस्थान करणे
५६) केव्हा
५७) छाती
५९) सोन्याचा धागा
६०) सहाय्य
६१) किरकोळ सामान
६२) मध, गोड
६३) मोठी सुरी
६४) पवित्र
६६) लाकूड कापण्याचे हत्यार
६८) बसण्याची फळी
६९) जपजाप्य
७२) पूर्ण भेदून जाणारे
७४) नृत्य
७६) गणपतीचे एक नाव
७७) जन्म-मृत्यू

**उभे शब्द :-**
२) पूजा साहित्याचे ताट
३) यमनगरी
४) माकड (हिं) जहाजांचे स्थानक
५) औषध
६) अक्षरापुढील रेघ
७) आच्छादन
८) आजच्या आधीचा दिवस
९) चोविसावे नक्षत्र
१०) लवकर,
१२) जनगणना
१३) वर्ष, साल
१६) युद्ध
१७) व्यर्थ, निष्फळ
१८) आजच्या आधीचा दिवस
२०) फुला फलाचा फांदीला चिकटलेली छोटी दांडी
२२) दारूचा एक प्रकार
२३) ऐसपैस घातलेली मांडी
२५) पाणी
३०) कावळा
३२) सहस्त्र
३३) घळ
३४) दूर करणारा
३५) नसणारा, अनावश्यक
३७) नजर (अ.व.)
३८) पाप
४०) खग
४२) समशेर
४३) केव्हा (ग्रा)
४४) केव्हा(ग्रा )
४५) डाळीचे पीठ
४६) मंदवासर
४९) फाशी देणारा
५१) दारावरील खुणेचा आवाज
५२) प्रफुल्लित
५५) दारू, मद्य
५८) नष्ट होणारे
५९) वजनदार
६०) भ्रमर, भुंगा
६१) सपाट
६३) पुत्र
६५) पराजय
६७) निरर्थक घोषणा, बढाई
६८) पांडवांची संख्या केस,
७०) अत्युच्च, अतिशय
७१) वाचन
७२) वेडावाकडा वाढणारा एक औषधी कंद
७३) पारद
७४) श्वसनेंद्रिय
७५) अवधान, लक्ष, चित्त

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# खवडा फेज - IV सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड

डीएलएफ सायबरपार्क, टॉवर-बी, ९ एच मजला उद्योग विहार, फेज III, सेक्टर-२०, गुरुग्राम, हरियाणा येथे नोंदणीकृत कार्यालय
CIN : U42202DL2023GOI420655 । फोन नंबर: ०१२४-४५६२०००

## सार्वजनिक सूचना

खवडा फेज - IV सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडचे नोंदणीकृत कार्यालय डीएलएफ सायबरपार्क, टॉवर -बी, ९ मजला उद्योग विहार, फेज III, सेक्टर - २०, गुरुग्राम, हरियाणा, भारत, विद्युत कायदा, २००३ च्या कलम १६४ अन्वये विजेच्या प्रसारणासाठी इलेक्ट्रिक लाईन्स किंवा इलेक्ट्रिकल प्लांट बसवण्याचे सर्व अधिकार त्यांना प्रदान करण्यासाठी भारत सरकारकडे अर्ज करण्याचा मानस आहे किंवा टेलीग्राफ लाईन्स लावण्याच्या संदर्भात भारतीय टेलिग्राफ कायदा, १८८५ अंतर्गत टेलीग्राफ प्राधिकरणाकडे असलेल्या कामांच्या योग्य समन्वयासाठी आवश्यक टेलिफोनिक किंवा टेलिग्राफिक संप्रेषणाच्या उद्देशाने आणि टेलीग्राफच्या उद्देशाने, सरकारने स्थापन केलेल्या किंवा देखरेखीसाठी किंवा अशा प्रकारे स्थापन केलेल्या किंवा राखल्या जातील आणि सर्वेक्षण, बांधकाम, स्थापना, तपासणी, उभारणी आणि कार्यान्वित, संचालन, देखभाल आणि इतर कामांद्वारे खालील ट्रान्समिशन योजनांसाठी होणारी इतर कामे हाती घेईल.

पारेषण योजनेचे नाव: फेज-IV (७ जीडब्ल्यू): भाग-क अंतर्गत गुजरातमधील खावडा भागातील संभाव्य अक्षय ऊर्जा क्षेत्रातून वीज बाहेर काढण्यासाठी ट्रान्समिशन सिस्टम

योजनेंतर्गत समाविष्ट कामे:

| अ.क्र | ट्रान्समिशन एलिमेंटचे नाव |
|---|---|
| 1 | 4X1500 एमव्हीए, 765/400 केव्ही आणि 2X500 एमव्हीए, 400/220 केव्ही बोईसर-II (जीआयएस) एस/एस ची 2X330 एमव्हीएआर, 765 केव्ही बस अणुभट्टी आणि 2X125 एमव्हीएआर, 420 केव्ही रीक्टर्सची स्थापना |
| 2 | दक्षिण ओलपाड (जीआयएस)-बोईसर II (जीआयएस) 765 केव्ही डी/सी लाईन |
| 3 | दक्षिण ओलपाड (जीआयएस) येथे 765 केव्ही लाईन बे चे २ नग दक्षिण ओलपाड (जीआयएस)-बोईसर-II (जीआयएस) 765 केव्ही डी/सी लाईन्सच्या समाप्तीसाठी |
| 4 | प्रत्येक सीकेटी वर 240 एमव्हीएआर स्विच करण्यायोग्य लाईन रिक्टर्स. दक्षिण ओलपाड (जीआयएस) आणि बोईसर-II (जीआयएस) येथे दक्षिण ओलपाड (जीआयएस)-बोईसर II (जीआयएस) 765 केव्ही डी/सी लाईन (एनजीआर बाय-पास व्यवस्थेसह) |
| 5 | लिलो ऑफ नवसारी (नवीन)-पडघे (पीजी) बोईसर-II येथे 765 केव्ही डी/सी लाईन |
| 6 | बोईसर -II (सेक्शन-II)-वेलगाव (एमएच) 400 केव्ही डी/सी (Quad ACSR/AAAC/AL59 मूसे समतुल्य) लाइन |
| 7 | बोईसर -II वेलगाव (एमएच) 400 केव्ही च्या टर्मिनेशनसाठी वेलगाव (एमएच) येथे 400 केव्ही लाईन बे चे 2 नंबर डी/सी ( Quad ACSR/AAAC/AL59 मूसे समतुल्य) रेखा |
| 8 | बोईसर-II (सेक्शन-I) येथे बाभळेश्वर-पडघे (एम) 400 केव्ही डी/सी लाईनचा लीलो ट्विन एचटीएलएस कंडक्टर वापरून किमान क्षमता 1700 एमव्हीए प्रति सीकेटी नाममात्र व्होल्टेजवर |
| 9 | बोईसर-II -बाभळेश्वरच्या बोसर-इल टोकावर 80 एमव्हीएआर स्विच करण्यायोग्य लाईन रिक्टर्स 400 केव्ही डी/सी लाईन (एनजीआर बाय-पास व्यवस्थेसह) लीलो नंतर तयार झाली |
| 10 | +200 एमव्हीएआर स्टेटकॉम 2X125 एमव्हीएआर एमएससी सह, 1X125 एमव्हीएआर एमएसआर बोईसर -II च्या 400 केव्ही बस विभाग -1 वर आणि ± 200 एमव्हीएआर स्टेटकॉम 2X125 एमव्हीएआर एमएससी सह, 1X125 एमव्हीएआर एमएसआर 400-केव्ही आहे |
| 11 | +300 एमव्हीए स्टेटकॉम 3X125 एमव्हीएआर एमएससी सह, 1X125 एमव्हीएआर एमएसआर नवसारी (नवीन) (पीजी) एस/एस च्या 400 केव्ही स्तरावर 400 केव्ही बे (जीआयएस) च्या 1 क्रमांकासह |

वरील पारेषण प्रकल्पाला भारत सरकार, उर्जा मंत्रालयाने विद्युत कायदा, २००३ च्या कलम ६८(१) अंतर्गत दिनांक १६.०२.२०२४ च्या पत्राद्वारे मान्यता दिली आहे. योजनेंतर्गत अंतर्भूत पारेषण लाईन खालील गावे, शहरे आणि शहरांमधून जातील.

i) दक्षिण ओलपाड (जीआयएस)-बोईसर-II (जीआयएस) ७६५ केव्ही डी/सी लाईन

| अ.क्र | खेड्याचे नाव | तहसील | जिल्हा | राज्य |
|---|---|---|---|---|
| 1 | वाघोटे, कंचाड, काळमखंड, रायसलपाडा, कुमडाळ, ब्राह्मणगाव, ब्राम्हणगाव, सप्रोंदे, सुपोंडे, कुर्ला, कुर्ले, दळवीपाडा, गुहीर, करंजाचपाडा, करंजपाडा, वाघोटे, कंचाड, मळ्याचापाडा, हमरापूर, हमारापूर, बर्फाचापाडा, मालपाडा, आम्भाली, आमगाव, कुतल, पोशेरी, पाली, सपने ख, सपने बी.के | वाडा | पालघर | महाराष्ट्र |
| 2 | माशेचपाडा, कासपाडा, शिशेत, शिलशेत, बोरांडे, ब्राह्मणपाडा, मालेरापाडा, बोरांडा, डबचरी, बोरीपाडा, घाणेघर, दोडदपाडा, राठेगुळपाडा, खांडेचीपाडा, अर्चितपाडा, वरंदळपाडा, नालशेत, केव, पडोळपाडा, भगतपाडा, काम्र्याच्यापाडा,आंबिवली,आंबिवली,कोथोरयाचापाडा,सावरोली, सावरोली, ब्राह्मणपाडा, पांबाचापाडा, इंदगाव, चिंचपाडा, गुणांगणपाडा, चंदनपाडा, बडाचापाडा, आलोंडे, कुंडाहापाडा, विमानपाडा, मोहो खुर्द, राड्याचापाडा, मोहो बुद्रुक, साजन, साजन तलाव, थापाडपाडा, झाडपोली, जाडपोली, शील, ओनडे, वांगनपाडा, जनतपाडा, खंद, चार्डीकपाडा, यशवंतनागर, टॉपलेचापडा, उंबाहपाडा, विक्रमगड, विक्रमगड सीटी, संगमनागर, सिफॉन, कमनपाडा, सिफोन, मन, सवडे, सवडे, पीएजीपीडा , बरफपाडा, खोबडपाडा, भोयाचापाडा, जाठेचापाडा, बरफपाडा, घाटापडा , मानपाडा , झिरवपाडा , दहेरजा , देहरजे , खनेचापाडा , भोईरपाडा , टेटवली , टेटवली , भुरखुडपाडा , उपराळे , बांधन , भिलिया डोंगर , ब्राह्मणपाडा , खांडेघर , गोंडपाडा , हातणे , हातणेपाडा , पाटीलपाडा , दाहेराजा, काडीपाडा, वाडपोळी, वाडापोळी, कुरांझे, कुर्झे, मासरोली, म्हसरोली, अर्जापाडा, कुणबिस्ते, कुंबस्तपाडा, गिंभळपाडा,भोईरपाडा,रायगुंजपाडा, मानपाडा, धगडीपाडा, फुटारकांडी, गिंभळपाडा, पाटीलपाडा, गिंभळपाडा, आपटी बुद्रुक, चरी बुद्रुक, लहांगेपाडा, चिंचघर, भोपोली, शिळ, पांढरपाडा, बांगरचोळे, गवळीपाडा, खडकीपाडा,वागोनपाडा, कक्कडपाडा, मेघावलीपाडा, फालवलपाडा,वैजलपाडा, वनस्पदा, गुरवपाडा, वातसपाडा, नडगपाडा, गुरवपाडा, नागझरी, नागझरी, ब्राह्मणपाडा, शिंपीपाडा, राऊतपाडा, सुकसाळे, दुमाडपाडा, गंगाडेकपाडा, शेवते, शेवते, खंडीचापाडा, अवलीचापाडा, अवलीचापाडा, डोलकरपाडा, भांडारपाडा, आंबेधळ, गर्धे, गदादाहे, चौधनपाडा, धोडापाडा, जबरपाडा, भरतपाडा, डोल्हारी खुर्द, डोल्हारी बुद्रुक, कोकणपाडा, खुटाडेपाडा, हळकणपाडा, सातकोरे, सातकोर, भगतपाडा, भरतपाडा, गुंठानपाडा, कालामपाडा, रामकुरकुट्टापाडा, वखानपाडा, दादडे, भोईपाडा, खरपापाडा, बाराफपाडा, नंदलपाडा, बाळापूर, केगवा, विठ्ठलनगर, कराचीपाडा, उभीदोंडपाडा, वेहेलपाडा, वेहेलपाडा, काल्पदा, काल्पदा, काल्पदा, काल्पदा, काल्पदा आपडा, सावरखान, मेढी, सावरज, देवापूर, आंबेघर, बाळापूर, तळवली ट्रॅफ डेंगाचिमट, वारणवाडी, मेडाचा पाडा, जांभे, मोलीपाडा, बोयचापाडा, खुडेत, खुडेड, चिखपाडा, जाधवपाडा, उंबरपाडा, देवीचापाडा, जिरारपाडा, बोयचापाडा, बोयचापाडा, बोयचापाडा, चुडेपाडा , अंधेरचापाडा , सावा , कुंभीच्यपाडा , कुंज, पायरच्यापाडा, गोंडचपाडा, तळवली, तळवली, तारफ, सातकोर, वेधे, वेधे, वासुरी, घाणेडा, घनोडे, उतावली, भानापूर, रामपूर, करसूद, चंद्रनगर, आनंदपूर, खडकी, सारशी, विलशेत, कोंडगाव, गवळीपाडापाडा, करपडापाडा, करसूद, आनंदपूर. , मुसळपाडा , फणसीपाडा , कुंभारपाडा , माथेरपाडा , आरतीपाडा , रहाटपाडा , कोकथरीपाडा , शिवाचापाडा , रेंजाडपाडा , वसवली , खडकी , खडकीपाडा , गोंडाचापाडा. | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |
| 3 | शिरोशीकलनपाडा, शिरोशी, काशिवली, काशिवली टारफ डेंगाचीमेट, विजयनगर, शिरोशीतांचापाडा, काशिवलीपाडा, काळमविहिरा, पाटेसिल्यचापाडा, आंबेच्यपाडा, डेंग्याचीमेट, डेंगाचीमेट, दळवीपाडा, कर्धन, बाळकपरा, कासटवाडी, पाटीलवाडवाड, गारदवाड, पाटील पाडा, देवीच्यापाडा, भोयाच्यापाडा, वडिच्यापाडा, हाडे, घोगऱ्याचीमेट, अडखडळ, अडखडक, कुतारविहीर, कुतुरविहीर, गणेशनगर, गोरठाण, लोहंबोंचापाडा, आयरे, चुडीचापाडा, सरसुनपाडा, बिजपाडा, विहिंच्यपाडा, आक्रे, तुळजापूर, कुंडुपाडा, हिरडीपाडा, बिजपाडा, अंब्याचपाडा चंद्रोतीपाडा, पालशिंद, पालशीन, अनंतनगर, देवगाव, चांदगाव, शिवाजी नगर, नडगपाडा, चांभारसेट, चांभारशेत, पागीपाडा, पिंपळशेत, पिंपळशेत, अमळचापाडा, कुंतीमाळ, दाभडपाडा, खैरमाळ, हत्तीपाडा, खिलारपाडा, पोपटगडपाडा, पोपटगडपाडा, पो , कोगडे, टंक्यचापाडा, आल्याचिमट, भोटाडपाडा, खडाडी, बांब्याचापाडा, हिरडपाडा, रातोंयाचापाडा, सरसून जांबुचापाडा, सरसून, दाभोस, दाभोसे, वडोली, वडोली, चिर्याच्नपाडा, बोंचाबाडा, देहेरे, बोनचापडा, देवेछापाडा, देवेचापाडा , उभीधोंड, खारोंडा , मोर्च्याचापाडा , मोर्चाचापाडा, दसकोड, भागडापाडा, भागाडा, ओझर ओझर, कोर्टाड महुचापाडा, सावरपाडा, पिंप्रण, दाभोस सांबरपाडा, दाभोस कडेचापाडा, सरसून वंदनपाडा, सरसून मोकाशीपाडा, सरसून मोहपाडा, सरसून पिंपळकडापाडा, सावरपाडा, सरसून पिंपळपाडा, सावरपाडा माळ, साखरशेत केळीचापाडा, उंबरविहीर, उंबरखेडा, साखरशेत महाल्याचापाडा, चाळीतवाड, कोर्टाड चौरीचापाडा, कोर्टाड तांदुळपाडा, कोर्टाड, सज्ञा मधे, मधे केडीचापाडा, मोटा मधे, मधे डुंगमपाडा, मेधा, तलाश्री, तलासरी, तलाश्री राजपाडा, बरवडपाडा, दाबलीपाडा, दादापाडा, दादापाडा. किरमिरे, दादर कोपरापाडा, जांभुळमाया, सूर्यनगर, खंबाळा, खंबाळे, साखरशेत, धादरी, दादरी, सरसून गावतकपाडा, सरसून पवनमाळ, डोंगीचापाडा, वांगणी, धाद्री चोकडीचिमली, धाद्री जामला, चौकीपाडा, ब्राह्मणपाडा, चकडीपाडा, दाहुल, दाभेरी कुशांबीपाडा, दाभेरी फणसीपाडा, कातारीपाडा, कातारीपाडा, कातारी चामल, बोपदरी पाचबुड , वावर सगपन , वावर , इववर , बेहाडपाडा , सारोली , बोपदरी , रुईघर , रामनगर , जयेश्वर , वाळवंडे , जुनी जव्हार , जव्हार ग्रामीण , जामसर , बोराळे , विनवळ , चंद्रनगर , खडखड , भरसातमेट , रुईघर | जव्हार | पालघर | महाराष्ट्र |
| 4 | करळगाव, तेना (तेन), सावरखंड, सावरखिन, कोसबाड, पोल, दुर्वेस | पालघर | पालघर | महाराष्ट्र |
| 5 | वांगणी, कायरी, दाभेरी, डाहुळ, तलासरी, खंबाळे | जवाहर | पालघर | महाराष्ट्र |
| 6 | बारावदपाडा, किरमिरे | जवाहर | पालघर | महाराष्ट्र |
| 7 | खडकहोळ, खंबाळे | त्रीबक | नाशिक | महाराष्ट्र |
| 8 | रुईघर, बोपदरी | जवाहर | पालघर | महाराष्ट्र |
| 9 | गलोंडा, किळवणी | किलवणी पटेलद | सिल्वासा | दादरा आणि नगर हवेली |
| 10 | बोन्टा | रणधाहा पटेलद | सिल्वासा | दादरा आणि नगर हवेली |
| 11 | सिल्वासा | सिल्वासा १ पटेलद | सिल्वासा | दादरा आणि नगर हवेली |
| 12 | बिलधारी, गुंसा, करचोंड, कौंचा, दुधनी, अंबाबारी, खेररबारी, घोडबारी | दुधनी पटेलद | खानवेल | दादरा आणि नगर हवेली |
| 13 | गोरटपाडा, शेल्टी | खानवेल पटेलद | खानवेल | दादरा आणि नगर हवेली |
| 14 | बेंसडा, वांसदा, खेडपा, सिंदोनी, बेडपा, मंडोनी, चिंसडा, डीएनएच (क्षेत्र) | मांडोनि पटेलद | खानवेल | दादरा आणि नगर हवेली |
| 15 | भाडोळ, सोंडामिठा, राजनगर, महामेदपोर, कणभी, संधियेर, आंधी, सरसाणा, तकर्मा, विहार, कछाब, कंथराज, कुडसद, करेली, सिठन, भारुंडी, उमराछी, ओभला, इसनपोर, एर्थन, स्याडला, कद्रमा, करमला, बोलाव, कन्यासी. अनिता, सिमलथु, पारडी भाडोली, आचरण, मोरठण, गोला, किममली, आटोद्रा, काठोदरा, किम काठोदरा, ओलपाड, वडोली, किम (सीटी), मूलड, भटगाम, कोसम, शेरडी, वडोद, मसमा, ओरमा, जाफ्राबाद, हाथीसा, अस्नाबाद , कुंभारी, खलीपोर, मधर, सिवान, अस्नाद, कासद, पारडी कोबा, थोथब, कोबा, पार्डी झांखरी, ग्यासपूर, परिया, देलाड, सायन (सीटी), नागोई, सोंडलाखरा, मिंदी, कमरोली, मंद्रोई, बलकस, तळाद, जोठण, सुनसक, सारोळी, कानड, कसला बुजरंग, कसाळा खुर्द, सारोळ, सारस, कुवाड, काचोल, वेळुक | ओलपाड | सुरत | गुजरात |
| 16 | मोळवण, अनसोडाळा, सियालज, मोती नरोली, वलेसा, कुमवरदा, वेलाच्छा, पिपोदरा, हातोडा, कोसंबा (सीटी), भातकोळ, मोटा बोरसरा, शेंठी, पालोद, नानी नरोली, घुंटी, पाणेठा, लिंबाडा, नोगामा, छमुच्छल, खारेड लिंड्याड, लिमोदरा, आसरमा, कुमवर्दा, हथुरन, महुजे, काथवडा, नांदव, सावा, मोती पारडी, राणकपोर, लुवारा, नोगामा, सिमोदरा, सुरळी, वडोली, वस्तान, उमेलाव, कोसंबा, इसनपूर, वड, तरसाडी, वाणसोली | मंगरोल | सुरत | गुजरात |
| 17 | नागोद, देठली, घळा, धाटवा, सेवनी, रुंधवडा, डुंगर, चिखली, देलाड, विहान, दिगस, सांपुरा, कर्जन, खानापूर, ओरणा, माच्छी, टिंबा, काठोदरा, देलोद, मोटा, थरोली, नवी पारडी, आखाखोल, धोरण पारडी घलुडी, अंत्रोली, खोलेश्वर, डुंगरा, ज्योर, ननसाड, कोळी भरठाणा, नेत्रंग, जोखा, धरुठा, जाट भरठाणा, आस्ता, मोरठाणा, सेगवा, पाली, मिरापूर, वंसदारुंधी, वलण, पराव, आलुरा, हलधारू | केमरेज | सुरत | गुजरात |
| 18 | वरेली, रोसवड, तडकेश्वर, करंज, वरेठी, विरपोर, नोगामा, उष्खेड रामकुंड, तोगापूर, खांजरोली, पाटणा, वडोद, बौधन, पिपरिया, मुंजलाव, कोलाकुई, कोलसणा, बोरीगाळा, नोगामा, केवडिया, गावछी, खारोळी, उष्खेड, उष्कड खुर्द, केवडी, अरेठ, वेगी | मांडवी | सुरत | गुजरात |
| 19 | भरमपोर, अकोटी, मंग्रोलिया, निझर, इस्रोली, राजपुरा लुंभा, पारडी वालोद, मोती, मोती फलोद, पलसोद, कंटाळी, मोटा, भामैया, किकवड, खरवसा, रायम, सरभोण, तिंबरवा, वाढवा, मोवाछी, इसनपोर, अस्तान, पारडी का पारडी वाघा, सांक्री, खळी, वराड, बामरोली, खोज, वांकानेर, कनई, धामदोड लुंभा, वा, पाथराडीया, मोती भातलाव, बारडोली(म), उतरा, दहा, पणडा, ताजपोर, उवा, वाघेचा कडोद, ताजपोर खुर्द, अल्लू गोजी, गोतासा, सारेठी, आफवा, रुवा, तरसाडी, पाथरोन, उचरेल, शेखपूर, देलोद, मोटा बाबेन, सरभोन, बाबला, अंचेली, वडोली, समठाण, पिपरिया, कराचका, हिंदोलिया, उमराख, नदिदा, ताजपोर बुजरंग, निनाद , मोरदेवी, बेबेन, बारडोली, वाघेच सरभोण, माणेकपूर, जाखर्डा, भुवासन, नौगामा, तरभोण | बारडोली | सुरत | गुजरात |
| 20 | जेतपोर, बारासाडी, वनेसा | पलसाणा | सुरत | गुजरात |
| 21 | वाच्छावद, अंधात्री, मुडत, बुधलेश्वर, धुंधेसा, ढेरवावरा, मियापूर, वाघेश्वर, नळधारा, ओंडच, शेखपूर, तरसाडी, महुवा, सणवल्ला, करचेलीया, खारवण, काणी, गोपला, नारदा, बारताड, वेलणपूर, महुडी, कोदडा, घावडा, घागरी जोल, बोरिया, रानात, कच्छल, शंकर तळवडी, पथ्रोन, ढोलीकुई, वांस्कुई, आमचक, कडिया, बिलखडी, खंडाळ, डेडवासन, अमरोली, कविता, निहाळी, करचेलियाचा भाग, बामनिया, गुणसवेल, कांकरिया, सांबा, कुमकोटर, डुंगरी , तरसाडी, भोरिया, डुंगरी, सेवासन, वांक, वडी, वसराई | महुवा | सुरत | गुजरात |
| 22 | पांजरोली, खरच, जेतपोर, आमोद, उटीयादरा, आसरमा, साहोळ, इलाव, सुनेवखुर्द, सुनी खुर्द, ओभा, डुंगरा, पांडवई, सुनेवकल्ला | हंसोट | भरुच | गुजरात |
| 23 | भुनवडी, उगट, कुंभार फळिया, नागधरा, महुडी, पुनी, नवापारा, उगट, सातेम, दाभलाई, बुटलाव, कांबडा | नवसारी | नवसारी | गुजरात |
| 24 | गांडेवा, माटवाड, एन्धळ | गाणदेवी | नवसारी | गुजरात |
| 25 | आमधरा, फडवेल, डोंजा, बोडवंक, रानकुवा, देगम, घोलार, सुरखई, बामनवाडा, नोगामा, अलीपोर, बरोलिया, मिंकछ, जोगवाड, टंकळ, माणेकपोर, मोगरावाडी, वांझना, रानवेरीकल्ला, सोलधारा, हरंगम, स्यादा, कालिया, चिलीम, रणवेरी, हरंगम. घेज, बामणवेल, उंडवल, रुमला, रेठवानिया, सदकपोर, सरैया, खांभडा, चासा, कंगवई, सदडवेल, खुडवेल, पिपळगभन, रानवेरीखुर्द, सुंठवड, तलावचोरा, माल्याधरा, कुकेरी, कानभाई, | चिखली | नवसारी | गुजरात |
| 26 | मरळा, भुतसर, दुलसाड, वलवाच, बोडलाई, फलधरा, कपरिया, वांकळ, कोसमकुवा, ओझर, वलंदी, काकडमती, चिंचई, आटगाम, पिठा, सारंगपूर, कांजन रणछोड, काचीगाम, वेलवाच. | वलसाड | वलसाड | गुजरात |
| 27 | कुरगाम, रानपाडा, बामटी, टंकी, तिस्करी तलत, राजपुरी तलत, विरवळ, बरसोल, बरोलिया, खारवेल, भांभा, नानी वहियाल, नानी ढोल डुंगरी, तुंबी, लकडमाळ, काकडकुवा, धरमपूर(मी), धरमपूर, मरघमाळ, खटाणा डुंगरी, असुर,बिलपुडी, झरिया, भेंसदरा, फुलवाडी, मंकडबन | धरमपूर | वलसाड | गुजरात |
| 28 | पाटी, धगडमाळ, चिवळ, नेवरी, दहेली, अर्नाळा, लखमापोर, कचवळ, मोटा वाघछिपा, पांचलाई, राबडी, समरपाडा, गोईमा | पारडी | वलसाड | गुजरात |
| 29 | बालचोंधी, उमरपाडा, वडखंभा, सुकलबारी, एकलेरा, मोती पलसन, खतुनिया, ओझर्डा, बामनवाडा, सुल्या, वरोली तलाठ, सिल्धा, रोहिलयाल जंगल, जाम गभन, तेरी चिखली, बुर्ला, बाबरखडक, रोह्याळ तलाठ, कुंभसेत, वाजवळ, काजवे, रोह्यालय. निर्वळ, आमधा, घाडवी, मांडवा, दिघी, असलकंती, केतकी, खातुनिया, जोगवेल, खुंटली, पेंढारदेवी, मोती वह्याळ, मनाळा, तितुमाळ, कास्टोनिया, उमळी, पानस, खडकवळ, मालुंगी, नाना पोंढा, खरेडी, कोठार, भांडार, कोठरी. , अंधारपाडा , हेडळबारी , वडधा , खडकवळ , दहीखेड , राजकरचोंड , वाडी , तिस्करीचे जंगल , घणवेरी , तुकवडा , धरनमाळ , भातेरी , वारणा , करचोंड , भाथेरी , वावर , नली मधनी , अर्णई , सुखाला , धोडद कुवा , काकडकोर , मोरगाव , अंधारपाडा , बुरवड , बुरवड , वरोली जंगल , चांदवेगण , कापराडा , बिलोनिया , दिवसी , लवकर , वरवठ , कर्जुन , निलोसी , सिंगारती , कोलवेरा , चेपा , सर्ववंती , लिहावद , नानी पलसन , घोटवळ, बिलानीया , वलवड | खापरादा | वलसाड | गुजरात |
| 30 | शिकेर, देऊळवाडा, मोरदेवी | वालोद | तापी | गुजरात |
| 31 | जामनपाडा, बहेज, पेलाडी भेरवी, वड, देबरपाडा, खेरगाम, रुझवणी, पणंज, गौरी, वडपाडा, वाव, चिमणपाडा, आच्छावणी, भेरवी, नांधई, नारणपोर, पाणिखडक, काकडवेरी | खेरगाम | नवसारी | गुजरात |
| 32 | वांदरवेळा | वनसडा | नवसारी | गुजरात |

ii) लिलो ऑफ नवसारी (नवीन)-पडघे (पीजी) बोईसर-II येथे ७६५ केव्ही डी/सी लाईन

| अ.क्र | खेड्याचे नाव | तहसील | जिल्हा | राज्य |
|---|---|---|---|---|
| 1. | करळगावपाडा, कळमखांड, सप्रोंदे, सुपोंडे, रॉयसलपाडा, कुमडाळ, ब्राह्मणगाव, ब्राम्हणगाव, पाष्टे, पिक, पोशेरी, मुंगुस्ते, वावेघर, वाघोटे, कंचाड, शेल्टे, मांडे, चनेमानीचापाडा, भोपीवली, देवली, देवळी, नागपाडपाडा, पिंपळगाव, पिंपळगाव, पिंपळगाव , पाली , सापणे खुर्द , भोईराचापाडा , सपने बुद्रुक , कोळेकरपाडा , सापनेपाडा , वरले , वराळे , कडिवली , करंजे ,वाडा, वाडा, हरोसाळे , देसाई , गाढे , मुरबी न , थुणावे , उमरोठे , मुरबीपाडा , खैरे , तारफळ , मोनिवली, मणिवल, ससाणे, शिलोतर, शिलोत्तर, नोकवचापाडा, काशिवलीपाडा, दैवलीकुंभिस्ते, दहिवली कुंभिस्ते, दहे, सोनशिव, कुर्ला (कुर्ले), दळवीपाडा, गुहीर, करंजचापाडा, करंजपाडा, मळ्याचापाडा, हमालपूर, हमालपूर, बफर्फाचापडा, मालपाडा, आमगाव, गल्तारे, अंभाई, देवळी तरफ कोहज, दाभोण, गारगाव, खुटाळ | वाडा | पालघर | महाराष्ट्र |
| 2. | करळगाव, तेना, दहा, सावरखिन, कोसबाड, पोळ, दुर्वेस, सावरखंड | पालघर | पालघर | महाराष्ट्र |
| 3. | माळा, माले, काशिवली, काशिवली टरफ आलोंडे, आपटी, आपटी ख., वासुरी, पांबाचापाडा, ब्राह्मणपाडा, इंदगाव, चिंचपाडा, माशेचपाडा, कासपाडा, शिलशेत, ब्राह्मणपाडा, मालेरापाडा, बोरांडे, बांगरचोळे, बोरडापाडा, घारपाडा, बोरांडे, बोरांडे, डबरी राठेगुळपाडा, खांदेचीपाडा, अर्चितपाडा, वरंदळपाडा, नळशेत, केव, पडोलपाडा, भगतपाडा, कोथ्याचापाडा, कडीपाडा, वडपोली, वडपोली, आंबिवली, आंबिवली, कोठोरयाचापाडा, सावरोली, वामनपाडा, गुनांगनपाडा, चंदपाडा, चंदपाडा, चंदपाडा , हातणे , हातणे, कुणबिस्ते, गिंभळपाडा, कुंभस्तपाडा, धगडीपाडा, पाटीलपाडा, कुरंजे, कुर्झे, मसरोली, म्हसरोली, अरजापाडा, भोईरपाडा, रायगुंजपाडा, मानपाडा, पांढरपाडा, शिळ, भोपोली, चिपटापाडा, चिंचघरडा, पंढरपाडा, पं घर, देहर्जे, शिळ , झाडपोली , झाडपोली , थापडपाडा , साजन , रामपूर , साजन तलाव , चिंचपाडा , जनतापाडा , वंगणपाडा , गोवितपाडा , वाकुडूचपाडा , वाकीज , वाकी , पाटीलपाडा , वाघपाडा , खोस्ते , बस्ते , उतावली , बडचापाडा , भाचापाडा , भाऊपाडा हरनोळीपाडा, माळवडा, माळवडे, शेलपाडा, कोटकवळ, पोटखळ, कवळे, कवळे, तळवली, तळवली, तारफ, सातकोर, वेधे, वेधे, घाणेडा, घनोडे, चारी बीके, आपटी बीके, बंधन, करसूद, कोंडगाव, विलशेत, चंद्रानगर, ब. , उपराळे, देहरजे, टेटवली, माण, ओंदे | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

iii) बोईसर -II (सेक्शन-II)-वेलगाव (एमएच) 400 केव्ही डी/सी (Quad ACSR/AAAC/AL59 मूसे समतुल्य) लाइन

| अ.क्र | खेड्याचे नाव | तहसील | जिल्हा | राज्य |
|---|---|---|---|---|
| 1 | कोळीपडगा, कल्लाळा, कल्लाळे, भुताळपाडा, माण, अट्टलपाडा, धापशीपाडा, दामातना, महागाव, वाळवेपाडा, वारंगडे, वाळवे, खानिवडे, शिगाव, खुताड, बेटेगाव, पडघे, नांदोरे, देवखोपे, कातळे, नानिवली, सागवे, बेलपाडा, बामणपाडा. सुमडापाडा, सुमडी, गारगाव, खानडी, रावते, रावते, अकोली, आसवलीपाडा, बोरशेत, चैतापाडा, सागवे, किरात, कुकडेपाडा, कुकडे, देवघर, गुंडले, गुंडले, करवेलपाडा, पुलाचापाडा, लालोंडा, चरी. खा., नागझरी, , नागझरी, निहा, निळजे, पांजरा, खुटाडपाडा, गिरनोली, लोवरे, लोवरे, वेलगाव, दमखंड, दमखिंड, कोंढाण, कोडेपाडा, डोंगरमाड, गुरवपाडा, बांधगाव, बांधन, अंबाला, आंबन, मेंढवण, आशेरी, कातळे तांबडमाळ, मनोर, मनोर सीटी, पाटीलपाडा, मातेरपाडा, भुयाळपाडा, अवधान, अवधान, दुखलपाडा, पारसीपाडा, कुंदनपाडा, देवीपाडा नांदगाव, नांदगाव टी. मनोर, पाटीलपाडा, बेलापाडा, नांदगाव, दुखपाडा, बाभनपाडा, तांबडपाडा, खारपाडा, खारपाडा. , दावेरपाडा, वाडा, वाडे, खडकोना, खडकवणे, पोळ, सावरखिने, सावरखंड, ताकवळ, ताकवाहल, रिगुपाडा, खुटाळपाडा, तांबडपाडा, रायपाडा, सावे, साये, दुर्वेस, सांबरपाडा, सावेपाडा, कसपडे, कोसबाड, करडाळगाव, तांबडपाडा, सावेपाडा. | पालघर | पालघर | महाराष्ट्र |
| 2 | मल्यचंदा करणीचानदा करनिनादा हमरापूर हमरापूर. खुटाळ. बरफचापाडा, मालपाडा, आमगाव, गुहीर, कुर्ले, आंभळी, रायसलपाडा, सप्रोंदे, सुपोंडे, ब्राह्मणगाव, ब्राम्हणगाव, कुमडाळ, वाघोटे, कंचाड, कलमखंड, पोशेरी, पाली, शेलते, वावेघर, मांडे, सपने खा., सपाणे खा. | वाडा | पालघर | महाराष्ट्र |
| 3 | लहंगेपाडा, थापडपाडा, कचरपाडा, घाणेघर, तळवली, तळवली टारफ सातकोर, मोहो बीके., बोरीपाडा, चिपतपाडा, भोपोली, दालचेरी, बोरांडा, बोरांडे, मालेरापाडा, शिळ, पांढरपाडा, बांगरचोळे, चिंचघर, फुटरखळी, मानपाडा, कुपडा, कुपडा, शिळ, पांढरपाडा. बोईरपाडा, रायगुंजपाडा, अरजापाडा, पाटीलपाडा, सावरोली, सावरोली, आंबिवली, आंबिवली, कुरंजे, कुर्झे, राठेगुळपाडा, कांदेचीपाडा, अर्चितपाडा, वरंदळपाडा, दोडदपाडा, मसरोली, म्हसरोली, ब्राह्मणपाडा, बरोंदळ, कोशेतपाडा, न दिपडा वडपोली, वडापोली, विलशेत, कोंडगाव, करसूद, घाणेडा, घनोडे, वेधे, वेधे, चारी बीके, आपटी बीके, बंधन, खांडेघर, हातणे, मोहो ख, इंदगाव, वासुरी, माण, शिळ, टेटवळे, चंद्रनगर, डोल्हारी बीके, सातकर, उपराळे, देहरजे, आलोंडे. | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

iv) बोईसर-II (सेक्शन-I) येथे बाभळेश्वर-पडघे (एम) 400 केव्ही डी/सी लाईनचा लीलो ट्विन एचटीएलएस कंडक्टर वापरून किमान क्षमता 1700 एमव्हीए प्रति सीकेटी नाममात्र व्होल्टेजवर

| अ.क्र | खेड्याचे नाव | तहसील | जिल्हा | राज्य |
|---|---|---|---|---|
| 1 | नांदकर, मुठवळ, मुठवळ, इताडे, सांगे, सवड, सावद, किरवली, करवली टारफ सोनाळे, आमनेपाडा, पिसे, आमने, आमने, खांडवळ, भावले, भावले, जानवल, जानवल, वाशेरे, पुरेपाडा, चिराडपाडा, लुपाडा, बोर अल्कोहपाडा, बोहिरपाडा, चिराडपाडा, वडापे, बोरिवली, बोरिवली टारफ सोनाळे सीटी, उसरोली कुकसे, उसरोली, कुकासे, भोईरगाव, सापे, वाशेरे, आटकोली, तळवली, तळवली ट्रॅफ सोनाळे, भदाणे, वांद्रे, अर्जुनली, पडघे, बोरगाव, बोरगाव, तरफ सोनाळे. सीटी, सोर, अणे, अन्हे, कळंबोली, काळभोळी, कांदळी, कांदळी ट्राफ राहुर, कोशिंबी, डोहळे, डोहोळे, भोकरी, भोकरी, देवळी, देवळी, चिंचवली टॅफ राहुर, वाफळे, कुरुंद, खंडपे, चिंचवली, चिंचवली ट्रॅफ वाहुले, सोर, आणे, चिंचवली. तळौली, तळवली ट्राफ राहुर, कासणे, कसणे, वडौली, वडवली ट्रॅफ राहुर, कुंभारशिव, राहुर, सावरोली, सावरोली ट्रॅफ राहुर, लप खुर्द, लप बुद्रुक, लपाळे, बांधन, वडवली टारफ दुगड, खलिंग बुद्रुक, मुर्हे, खलिंग, प. निवळी, सुपेगाव, लामज, चावे, दवळी, भरे, आवळवले, दाळेपाडा, तुळशी, तुळशी, करंजोटी, तुंगार्थन, मोहंडुळ, महोंदुळ, मोहोंडूळ, शिरगाव, खंबाळे, कुशिवली, खुशीवली, कोशिंबे, महापोली, महापोली, तारगाव, दुगावठाण, वाडीवस्ती, कोशिंबे. हिवली, किरवली, किरवली दुरावली, पाली, करंजोती, महाप, शिरोळे, पाच्छापूर, मालबिडी, सूर्यनगर, मोहिली बीके, वावळी टारफ दुगड, विश्वगड, दाभड, पायथ्या, गोंदाडे, शेडगाव, अस्नोली, अस्नोली ट्रेफ कुंदे, अस्नोली, गोंदरावली, पहारे, चणे, वरेल, वरेत, सायगाव, दुगड, दुगड, आस्नोली. , खातिवली, झिडके, झिडके, रावडी, आशिवली, कुंदे, घडणे, वेधे, कांदळी बीके, मोरणी, दुधनी, कुसापूर, रावडी, अंबाडी, खडी , विर, महाळुंगे, सावरोली, सावरोली टारफ दुगड, वज्रेश्वरी, पालखी, इ.स. , चिंचौली, चिंचवली, आटकोहपाडा, निवळी, सुपेगाव, भिलपाडा, वाफळेपाडा, चिंबीचापाडा, वांद्रे, घागसपाडा, जुनपाडा, दिनकरपाडा, घोडवडावपाडा, मोहिली, मोहिली बीके, वडाचापाडा, मराठ्याचापाडा, वडचापाडा, मोहोळपाडा, आवळपाडा, आवळपाडा , कोरडेपाडा , लात्याचापाडा, चाप्याचापाडा, मानिवली, वावली, घोड वडावपाडा, भेंडीपाडा, राऊतपाडा, तुंगार्थन, ठाकूरपाडा, खानिवली, खैरपाडा, सरमाळ, अस्नोली, अस्नोली ट्रेफ कुंडे, अनसोलीपाडा, बोल्डर्स, पिरपाडा, वधेगावपाडा, जांबळीपाडा, जांबळीपाडा, उंबर्लीपाडा अले, अस्नोली, अस्नोली ट्रेफ कुंदे, करमाळे, खानवली, दालोंडे, दिघाशी, अकलोली, सावरोली, सावरोली ट्रॅफ दुगड, अस्नोली, अस्नोली टार्फ दुगड, खरीवली, वापे, लोणाड, गोराड | भिवंडी | ठाणे | महाराष्ट्र |
| 2 | अंताडे, आपटी टारफ चोन, मांजळी, मांजली टारफ बन्हे, भिसोद, कांबे, कांबे सीटी, कल्याण डोंबिवली एम कॉर्प, कोंढेरी, सांगोडे, वाहोली, आणे, रोहन, रोण, चवरे, चावरे, अन्याचापाडा, वाघेरा, पांजरापुरा, मोहलीपाडा, वाळवंट. पिंपळोली, पिंपळोली, रायते, गोवेली, रेवती, रेवती, फेरी, मोहिली, माणिवली, मानिवली, देशपांडेपाडा, घोटसई, नांदप, उंभारणी, बल्याणी, बापसई, नवगाव, म्हसकरपाडा, अंखर, अंखरपाडा, केळणी, कोळींबोली, आडगाव, आडगाव, कोळंबी , दहिवली, रुंदे, मानडपाडा, टाटवली आर.एस., टिटवाळा, गुरवपाडा, मांडे, कोंडेनपाडा, वासुंद्री, मोसे, मोस, निंबवली, गुरवली, गुरवलीपाडा, ओझुर्ली, ओझर्ली, राये, पिताबरे नगर, चिंचवली, चिंचवली, नाडवडगाव, आंबडगाव, आंबटगाव, उ. , आंबिवली टारफ वासुंद्री, बेलपाडा, फाळेगाव, उशीद, आरेला, दाबूळपाडा, वावेघर, जु, ठाकूरपाडा, भेरे, वालकस, पळसोली, वेहळे, काकरपाडा, कोसले, कोसले, चेरसे, गेरासे, आपटी टारफ चोन, खडवली, खडवली, चौरे, चौरा,पिंपलोली, पिंपलोली | कल्याण | ठाणे | महाराष्ट्र |
| 3 | पोळ, कोसबाड, करळगाव, सावरे, जयशेत, जयशेल, सावरखिंड, सावरखंड, सावरे, तेना, तेन | पालघर | पालघर | महाराष्ट्र |
| 4 | हाल, माढा, मढ, वासिंद, वाशिंद सीटी, अंबुर्जे, भातसई, पाली, सरमलगृपाडा सरमल, साने, खातिवली, काटबाव, दहागाव | शहापूर | ठाणे | महाराष्ट्र |
| 5 | मेट, घोणसई, उचाट, नरे, घोणसई, उसर, मागाठाणे, खोणसई, खोंसईपाडा, लोहोपे, लोहापे, डाकिवली, डाकिवली, चांबळे, चांबळे, नेवाळपाडा, केळठण, गोराड, धोडनापाडा, कोथ्याचापाडा, मुसरणे, वडवली, पोहोळपाडा, वडवली. दिनकरपाडा, सापरोंडे, कोंढाळे, कुडूस, कुडूस सीटी, चिंचघरपाडा, चिंचघर, चिंचघर, विजयगड, जांभूळपाडा, डोंगस्ते, किरिवली, खारीवली टारफ पौलबार, भिलावली, बिलावली, बुधवली, गुंज, देवगड, गुंठे, गुंठा, कांबळे, कांबळे. कळंभई, बिलोशी, वसुरी खुर्द, लखामापूर, जामघर, कोनसई, खुपरी, भोईरपाडा, भावेघर, भावेहर, निचोळे, आंबिस्ते बुद्रुक, आंबिस्ते खुर्द, पिंपळस, पिंपळस, विटामा नगर, खानिवली, गौरापूर, आसननाथ, बोळगाव, आंबिस्ते, आंबीस्टे. एन, पाडा, पळसई, खैरातपाडा, अवंधे, वासुरी बुद्रुक, टाकळीपाडा, सिंदीपाडा, सांगे, नाणे, खारिवली, खारिवली टारफ कोहोज, आपटीपाडा, आपटी, कुंभारकुप, देवली, देवळी टारफ कोहज, अवचितपाडा, गोर्हे, भोपळे, मुंढे, मुंढरे , वावेघर, पोशेरी, गंगाधरपाडा, चनेमणीचापाडा, कलमखंड, कांचाड, वाघोटे, शेल्टे, धुसाळपाडा, कुर्ला, कुर्ले, धुसाळपाडा, दळवीपाडा, गुहीर, मळ्याचापाडा, कारंजाचापाडा, हमरापूर, बरफचापाडा, आंभाळी, आंभाळी,रायसलपाडा, साप्रोनदे, चिंचपाडा, ईदगाव, ब्राम्हणपाडा, कोचेचापाडा , ब्राह्मणगाव, कुमडाळ, सुपोंडे, ब्राम्हणगाव, आमगाव, मालपाडा, खुटाळ, करंजपाडा, डाकिवली , डाकिवली, खानिवली, खानिवली, वर्धा. | वाडा | पालघर | महाराष्ट्र |
| 6 | करळगावपाडा, कडीपाडा, आंबिवली, आंबिवली, आंबिवली, वडपोली, वडपोली, सावरोली, इंदगाव, मोहो ख, कुरंजे, पाटीलपाडा, कुणबिस्ते, आरजपाडा, भोईरपाडा, गिंभळपाडा, गिंभाईपाडा, मानपाडा, भगतपाडा, पडोळपाडा, पडोळपाडा, पडोळपाडा, भोईरपाडा. , शिलशेत , मासरोली , म्हसरोली , कुर्झे, शिळ , पांढरपाडा , राठेगुळपाडा , खांडेचीपाडा , अर्चितपाडा , वरंदळपाडा , माशेचापाडा , कसपडे , ब्राह्मणपाडा , बोरांडे , बोरांडा , भोपोली , डबचरी , मालेरापाडा , करळगाव , अरचीपाडा , करळगाव , अरचीपाडा , करळगाव आंदलपाडा , माशेचापाडा, कासपडे, बांगरचोळे, ब्राह्मणपाडा, बोरांडे, भोपोली, डबचरी, मालेरापाडा, करळगाव, करळगावपाडा, चिंचघर, कचरपाडा, घाणेघर, भोपोली, तळवली तारफ सातकोर, तळवली, वेधे, वेढे, चारी खांजे, खाणघर, ए. , देहेरजा, हातणे, मोहो बीके, घाणेडा, घनोडे, वासुरी, आपटी ख, आलोंडे, करसूद, थापडपाडा, लहंगेपाडा, गवळीपाडा, फरापडा, आपटी बुदुरक, चारी बुदुरक, खनेचापाडा, फुटारकांडी, धगडीपाडा, कुंभाडापाडा, कुंभाडपाडा, गवळीपाडा मोहो खुर्द, चंदनपाडा, वामनपाडा, गुनांगनपाडा, कवळे, राड्याचापाडा. | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |
| 7 | घोसई, असोदे | मुरबाड | ठाणे | महाराष्ट्र |

मार्ग संरेखनाची प्रत खाली स्वाक्षरी केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहे. ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत प्रस्तावित पारेषण प्रणालीवर निरिक्षण/निरीक्षण करण्यासाठी सामान्य जनतेला नोटीस देण्यात आली आहे. अधिक तपशील आणि स्पष्टीकरणासाठी कृपया संपर्क साधा:

नाव: श्री. टी अमरेंद्र नाथ रेड्डी, पद: मुख्य-व्यवसाय आणि नियामक
कार्यालयाचा पत्ता: डीएलएफ सायबरपार्क, टॉवर-बी, ९ मजला उद्योग विहार, फेज III, सेक्टर-२०, गुरुग्राम, हरियाणा
ईमेल पत्ता: tan.reddy@sterlite.com ईमेल पत्ता फोन नंबर: sangeet.attri@sterlite.com/8745915399

# कॅलिडोस्कोप



## हॉर्स शू बेंड

जगात आनल्याला अनेक नैसर्गिक आश्चर्यं पाहायला मिळतात. निसर्गात आपल्याला श्वास रोखून ठेवायला लावणारी अनेक ठिकाणं दिसतात. वरील छायाचित्रही त्यापैकीच एक. ॲरिझोनामधल्या कोलोरॅडो नदीचा आकार या ठिकाणी घोड्याच्या नालेसारखा झाला आहे. म्हणून या ठिकाणाला हॉर्स शू बेंड असं म्हटलं जातं.

## कबुतराची किंमत

या जगात कोणाला कशाचं वेड असेल हे सांगता येत नाही. आपली आवडती गोष्ट खरेदी करण्यासाठी माणूस कितीही पैसे खर्च करू शकतो. आता बेल्जियममधल्या एका कबुतराला चीनमधल्या एक इसमाने तब्बल १.२५ दशलक्ष युरो म्हणजे तब्बल ९.६ कोटी रुपये देऊन खरेदी केलं. हे कबुतर युरोपातल्या बर्ड रेसिंग स्पर्धेचं विजेता होतं. ‘आर्मांडो’ असं त्याचं नाव. ‘आर्मांडो’ने २०१८ मध्ये ‘बर्ड रेसिंग’ स्पर्धा जिंकली होती. जोएल वर्शूट यांनी हे कबुतर पाळलं होतं. ‘आर्मांडो’च्या लिलावात एवढे पैसे मिळतील, याची मला अजिबात कल्पना नव्हती असं जोएल सांगतात. त्यांनीच या कबुतरांना स्पर्धेत सहभागी होण्याचं प्रशिक्षण दिलं. आर्मांडोच्या याच कौशल्याने प्रभावित होऊन दोन चीनी नागरिकांनी त्यांच्याशी संपर्क साधला. आर्मांडोच्या लिलावाची प्रक्रिया दोन आठवडे सुरू होती. शेवटच्या तासाभरात त्याच्यावर तब्बल एक लाख युरोंची बोली लाागली. दुसऱ्या वेळी त्यात दोन हजार युरोंची वाढ करण्यात आली. त्यानंतर या बोलीचा आकडा १२ लाख ५२ युरोपर्यंत जाऊन पोहोचला आणि कबुतराचा लिलाव संपन्न झाला. जोएल यांच्याकडे जवळपास ५०० पक्षी आहेत. ते या पक्ष्यांचा लिलाव करत असतात. २०१७ मध्येही शिंग वेई नावाच्या चीनी व्यावसायिकाने चार लाख युरो देऊन त्यांच्याकडचं कबुतर विकत घेतलं होतं. जोएल दिवसातले बारा तास या पक्ष्यांसोबत घालवतात. जोएल यांनी प्रशिक्षण दिलेले पक्षी कोणत्याही वातावरणात आणि परिस्थितीत उडू शकतात, असं म्हटलं जातं. ‘आर्मांडो’ पाच वर्षांचा असून आता बर्ड रेसिंग स्पर्धेतून निवृत्त होण्याची त्याची वेळ आली आहे. मात्र त्याचं दिशेचं ज्ञान अगदी पक्कं असल्याचं जोएल सांगतात. गेल्या काही वर्षांत चीनमध्ये बर्ड रेसिंग मोठ्या प्रमाणात वाढलं आहे. त्यामुळे इथले लोक वाट्टेल त्या किंमतीत प्रशिक्षित कबुतरं खरेदी करायला तयार होतात.



## कुत्र्यामुळे गर्भपात

कल्पना करा की त्या गर्भवती महिलेचे काय झाले असेल, जिने गर्भवती राहण्यासाठी वर्षानुवर्षे संघर्ष केला आणि दुर्दैवी अपघातात ते गमावले. यान नावाची ही महिला घराबाहेर फिरत असताना एका पाळीव कुत्र्याने तिच्यावर उडी मारली. कुत्र्याच्या अचानक हल्ल्यामुळे महिला घाबरली आणि पडली. त्यामुळे तिला पोटाच्या खालच्या भागात दुखू लागले. नंतर कळले, की तिचा गर्भपात झाला आहे. या घटनेनंतर कुत्र्याच्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला लाखो रुपये दंड भरावा लागला.



अनेक वेळा सार्वजनिक ठिकाणी पाळीव प्राणी मोकळे सोडल्याने त्याचे परिणाम इतरांना भोगावे लागतात. बीजिंगमधील ४१ वर्षीय यानला शारीरिक दुखापती तसेच गर्भपात झाला, जो कोणत्याही गर्भवती महिलेसाठी अत्यंत क्लेशकारक अनुभव असू शकतो. विशेषतः जेव्हा ती इन विट्रो फर्टिलायझेशन (आयव्हीएफ) सारख्या कठीण आणि खर्चिक प्रक्रियेतून गरोदर राहिली. यानने गेल्या काही वर्षांपासून ‘आयव्हीएफ’द्वारे गर्भधारणेचा प्रयत्न केला आणि या वर्षी त्यांना बाळाची अपेक्षा असताना, कुत्र्याने सर्व काही उद्ध्वस्त केले. ती पार्सल घेण्यासाठी घराबाहेर पडली, तेव्हा एका कुत्र्याने तिच्यावर हल्ला केला. चीनी मीडियानुसार, कुत्र्याने अचानक उडी मारल्याने यानला धक्का बसला आणि ती पडली. तिच्या पाठीला दुखापत झाली आणि तिच्या ओटीपोटात दुखू लागले. त्या भयानक क्षणाची आठवण करून देताना यान म्हणाली, की मी चार महिन्यांची गरोदर होते. कुत्र्याच्या हल्ल्यामुळे मी घाबरले आणि खाली पडले. मला पोटात खूप दुखू लागले. ती हॉस्पिटलमध्ये गेली, तेव्हा डॉक्टरांनी सांगितले, की तिच्या मुलाला वाचवता येणार नाही. ती म्हणाली, की मी तीन वर्षांपासून ‘आयव्हीएफ’ उपचार घेत आहे. आता माझा गर्भपात झाला आहे. माझे मूल गमावल्याने मला खूप दुःख झाले आहे. यानंतर तिने कुत्र्याचा मालक ली यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. चीनमध्ये पाळीव कुत्र्यांना उघड्यावर सोडण्याविरोधात कडक कायदा आहे. ही अत्यंत अस्वस्थ करणारी घटना असल्याचे सांगत न्यायालयाने ली यांना ९०,००० युआन (१० लाखांपेक्षा जास्त) देण्याचे आदेश दिले.

## अजब म्युझियम

तुम्ही विविध वस्तूसंग्रहालयांना भेट दिली असेल. भल्याम ोठ्या परिसरात पसरलेली तीन ते चार मजली इमारतीतली ही वस्तूसंग्रहालयं देश आणि विदेशात मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा संग्रहालयांमध्ये पुरातन, ऐतिहासिक वस्तू जतन करून ठेवलेल्या असतात. जुनी नाणी, नोटा, राजेमहाराजांच्या तलवारी, इतर शस्त्र, राजमहालातल्या वस्तू असं बरंच काही इथे पहायला मिळतं. मात्र इंग्लंडमधलं एक म्युझियम खूप खास आहे. याचं कारण म्हणजे ते एका टेलिफोन बूथमध्ये साकारण्यात आलं असून जगातलं सर्वात लहान म्युझियम असल्याचं बोललं जातं. टेलिफोन बूथ हा प्रकार काळाच्या ओघात लोप पावला आहे. प्रत्येकाच्या हातात मोबाईल असल्याने एक रुपया किंवा पाउंड टाकून फोन करण्याचा विचारही कोणी करत नाही. त्यामुळे टेलिफोन बूथ इतिहासजमा झाले आहेत. म्हणूनच एका संस्थेने टेलिफोन बूथचं जतन करायचं ठरवलं. पुढच्या पिढीला याचं महत्त्व कळावं यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. त्यांनी एका टेलिफोन बूथचं रुपांतर म्युझियममध्ये करून टाकलं. ‘ब्रिटन टेलिकम्युनिकेशन’ने वापरात नसलेले ४३ टेलिफोन काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र ‘वॉरले कम्युनिटी असोसिएशन’ नामक संस्थेने त्यांचं जतन करायचं ठरवलं. २००८ पासूनच ही संस्था विविध मार्गांने पैसे जमवून पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करते आहे. याच प्रयत्नांतून पश्चिम यॉर्कशायरमधल्या एका टेलिफोन बुथचं रुपांतर म्युझियममध्ये करण्यात आलं. हे म्युझियम अवघ्या ३६ चौरस फूट परिसरात पसरलं आहे. एवढ्या छोट्या जागेत बऱ्याच गोष्टी ठेवण्यात आल्या आहेत. जुने फोटो, दागिने, टेलिफोन बुथचा इतिहास असं बरंच काही इथे पहायला मिळतं. ‘द मेपोल इन’ असं या संग्रहालयाचं नाव आहे. हे छोटेखानी संग्रहालय पाहण्यासाठी लोकांच्या रांगा लागलेल्या असतात. विशेष म्हणजे दर तीन महिन्यांनी या बूथ म्युझियममध्ये नव्या वस्तू ठेवल्या जातात.



## लाडक्या बहिणींनी लुटल्या साड्या!

राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना मोठी चर्चेची आणि तितकीच लोकप्रिय ठरली आहे. राज्य सरकारकडून आत्तापर्यंत तब्बल दोन कोटींपेक्षा जास्त महिलांच्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे, महिला भगिनींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सरकारकडून दरमहा १५०० रुपये मानधन, ओवळणी मिळत असल्याने महिलांना समाधान वाटते. त्याच पार्श्वभूमीवर राज्य सरकार व महायुतीमधील तिन्ही पक्षांकडून या योजनेच्या निमित्ताने कार्यक्रम घेऊन महिला भगिनींना आकर्षित केले जात आहे. कुठे महिलांसाठी विविध वस्तूंचे वाटप केले जाते, तर कुठे साड्यावाटप होत आहे. कुठे स्वत: मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री भेट देत आहेत. नांदेड जिल्ह्यात लाडक्या बहिणीशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते; मात्र या कार्यक्रमात चांगलाच गोंधळ उडाला. दरम्यान, महिलांची साड्या घेण्यासाठी झुंबड उडाल्याने साड्या वाटप ऐवजी साड्या लुटल्या. नांदेड जिल्ह्यात भाजपच्या वतीने आयोजित कार्यक्रमात चांगलाच फज्जा उडाला. विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपल्याने सर्वच पक्षात श्रेयवादाची चढाओढ लागली आहे. लाडकी बहीण योजनेचे श्रेय घेण्यासाठी महायुतीतील तिन्ही पक्ष एकमेकांना टस्सल देत आहेत. या कार्यक्रमात दोन हजार साड्या वाटप करण्याचे नियोजन आयोजकांकडून करण्यात आले होते; परंतु ऐनवेळी महिलांची संख्या जास्त झाल्याने साडी घेण्यासाठी महिलांची एकच झुंबड उडाली. नियोजनानुसार आयोजकांकडे साड्यांची संख्या कमी पडल्याने या ठिकाणी साड्या घेण्यासाठी महिलांनी गर्दी केली. त्यामुळे साड्या वाटपापूर्वीच हा कार्यक्रम आयोजकांना बंद करावा लागला. या वेळी अनेक महिला साड्या न घेताच परत गेल्या. सकाळपासून साड्या घेण्यासाठी महिला तामसा येथे हजर झाल्या होत्या; परंतु साड्या न मिळाल्याने लाडक्या बहिणींचा हिरमोड झाला. ज्या महिलांना साड्या मिळाल्या नाहीत, त्या महिलांनी संताप व्यक्त केला आहे. आम्ही आता साड्या घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जायचे का, असा सवालही या महिलांनी केला.



## रहा पाण्याखाली

खोल समुद्रात, बाहेरची जलसंपदा न्याहाळत जेवायला किती मस्त वाटेल ना? नॉर्वेमध्ये युरोपमधलं पहिलं पाण्याखालचं म्हणजे अंडरवॉटर रेस्टॉरंट आहे. या देशातल्या बॅलीमध्ये हे रेस्टॉरंट असून इथे ४० लोकांच्या राहण्याचीही व्यवस्था आहे. या ठिकाणी एका वेळी १०० लोक बसून जेवू शकतात. रेस्टॉरंट सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी तुफान प्रतिसाद मिळाला. तब्बल ७००० लोकांनी डिनरसाठी ऑनलाईन टेबल बुक केलं. अर्थात वेगवेगळ्या दिवसांसाठी टेबल बुक करण्यात आल्याने कोणालाही नकार द्यावा लागला नाही. ३४ मीटर लांब असलेल्या या रेस्टॉरंटचा पुढचा भाग जमिनीशी जोडलेला आहे तर मागचा भाग पाच मीटर खोल वसलेला आहे. रेस्टोरंटच्या आत काचा लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांना बाहेरचं सौंदर्य, समुद्री जीवन न्याहाळता येतं. अचानक एखादा मासा आपल्या जवळ येऊन जातो. रेस्टॉरंटचा आतला भाग एखाद्या मत्स्यालयासारखा दिसतो. अर्थात हे जगातलं पहिलं पाण्याखालचं रेस्टॉरंट नाही. याआधी मालदीवमध्ये अंडरवॉटर हॉटेल सुरू करण्यात आलं आहे. ‘मारुका’ नावाच्या या हॉटेलमध्ये राहण्यासाठी चार रात्रींचं पॅकेज घ्यावं लागतं. या पॅकेजची किंमत थोडीथोडकी नाही तर १.४ कोटी रुपये आहे. म्हणजे एक रात्र थांबायचं असेल तर ३६ लाख रुपये भरावे लागतील. पण इथे येणाऱ्या पर्यटकांना पूर्ण पॅकेज घ्यावं लागतं. बराच खर्च असला तरी पाण्याखाली राहण्याचा अनुभव भन्नाट म्हटला पाहिजे.



## झाडही अटकेत

माणसांना अटक होते. क्वचित प्रसंगी प्राण्यांच्या अटकेच्या घटना समोर येतात. मात्र निरुपद्रवी झाडाला कोणी अटक करेल का? पाकिस्तानातल्या खैबर पख्तूनख्वा भागातलं एक झाड अटकेत आहे. विशेष म्हणजे गेल्या १२१ वर्षांपासून ते कैद भोगत आहे. इथल्या वडाच्या झाडाला साखळदंडांनी बांधून ठेवण्यात आलं असून त्यावर आय ॲम अंडर अरेस्ट म्हणजे मी अटकेत आहे असा फलकही लावण्यात आला आहे. खैबर प्रांतातल्या लंडी कोतल परिसरात हे झाड असून ब्रिटिश काळातल्या जुलुमांचं प्रतिक म्हणून आजही त्याला या साखळदंडांमधून मुक्त करण्यात आलेलं नाही. या झाडाच्या अटकेचं कारण जाणून घेण्यासाठी आपल्याला इतिहासात डोकवावं लागेल. भारतावर ब्रिटिशांचं राज्य असताना म्हणजे १८९८ मध्ये ब्रिटिश अधिकारी जेम्स स्क्वॉयंड मद्यपान करून या परिसरात फिरत होता. आपल्या समोर असलेलं वडाचं झाड वेगाने आपल्या दिशेने येत असल्याचा भास त्याला झाला. यामुळे प्रचंड घाबरलेल्या जेम्सने झाड ताब्यात घेण्याचे आदेश ब्रिटिश सैनिकांना दिले. त्यांनीही आपल्या वरिष्ट अधिकाऱ्याच्या आदेशाचं पालन करून झाडाला साखळदंडांनी बांधून टाकलं. १२१ वर्षांनंतरही या झाडची साखळदंडांमधून मुक्तता झालेली नाही. हे झाड ब्रिटिशांनी केलेल्या अनन्वित अत्याचारांचं प्रतिक असल्याचं तिथल्या लोकांचं म्हणणं आहे. त्या काळात ब्रिटिशांनी अनेक क्रूर कायदे केले होते. त्यापैकी एक म्हणजे ‘ब्रिटिश राज फ्रंटियर क्राईम्स रेग्युलेशन’. ब्रिटिशांना असलेल्या पश्तूनी लोकांचा विरोध मोडून काढण्यासाठी हा कायदा आणण्यात आला. या अंतर्गत पश्तूनी जातीच्या लोकांना कोणतीही शहानिशा न करता थेट अटक करण्याचा अधिकार ब्रिटिशांना मिळाला होता. महत्त्वाचं म्हणजे या कायद्याचं अस्तित्त्व आजही या परिसरात आहे. यामुळे इथल्या लोकांचे बरेच अधिकार डावलले गेले आहेत. हा कायदा म्हणजे मानवाधिकारांचं उल्लंघन असल्याचं म्हटलं जातं.



## प्रवास जनजागृतीसाठी


आता इलेक्ट्रिकल कार्सचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असलं तरी काही वर्षांपूर्वी असं नव्हतं. याच काळात एका इलेक्ट्रिक कार चालकाने लोकांच्या सहकार्याने तीन वर्षांत ९० हजार किलोमीटरचा प्रवास केला होता. शून्य कार्बन उत्सर्जनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने विब वेकर मार्च २०१६ मध्ये घराबाहेर पडला. तेव्हा त्याच्याकडे पुरेसा पैसा नव्हता. मधल्या काळात इलेक्ट्रिक कारच्या दुरुस्तीसाठी त्याने २० हजार युरो म्हणजे जवळपास १५,६२,००० रुपये खर्च केले. विबने यापैकी काही पैसे लोकांच्या मदतीने तर काही काम करून मिळवले. या इलेक्ट्रिक कारमधून विबने नॉर्वे ते इराण आणि म्यानमार ते संयुक्त अरब अमिरात असा प्रवास केला. या प्रवासाची अखेर ऑस्ट्रेलियातल्या सिडनीमध्ये झाली. या प्रवासाचा नेमका खर्च सांगणं कठीण असल्याचं विब सांगतो. मात्र या दरम्यान जेवण आणि राहण्याची सोय फुकट झाल्याचंही तो सांगतो. या काळात विबची अनेकांनी मदत केली. मध्यपूर्व तसंच भारतातल्या काही असुरक्षित भागातही तो गेला. मात्र प्रत्येक ठिकाणच्या स्थानिकांची त्याचं स्वागत केलं आणि पूर्ण सहकार्यही केलं. शक्य तिथे त्याने गाडी स्वत: चालवली. काही ठिकाणी त्याल गाडी बोटीने पाठवावी लागली. पैसे जमवण्यासाठी कामंही केली. या दरम्यान त्याला बऱ्याच अडचणींना सामोरं जावं लागलं. भारतात गाडीच्या मागचे टायर खराब झाले तर इंडोनेशियामध्ये गाडीत पाणी शिरलं. गाडीच्या दुरुस्तीचं काम हॉलंडमधले मॅकेनिकच करू शकत होते. क्राउड फंडींगच्या माध्यमातून त्याने जवळपास पाच हजार युरो म्हणजे चार लाख रुपये जमवले. कार्बनचं उत्सर्जन कमी



## सर्जिकल ब्लेड पोटात राहिल्याने मृत्यू

एका गर्भवती महिलेचा बाळंतपणात मृत्यू झाला. कुटुंबीयांनी तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले; पण दुसऱ्या दिवशी ज्या वेळी मृत महिलेचा पती मृतदेहाची राख घेण्यासाठी गेला, त्या वेळी त्याला धक्का बसला. मेरठमधली ही घटना आहे. मेरठमधल्या हस्तिनापूर भागातील राठोरा खुर्द गावातील ही घटना आहे. इथे राहाणाऱ्या संदीप या तरुणाची पत्नी नवनीत कौर गरोदर होती. नवा पाहुणा येणार असल्याने घरात आनंदाचे वातावरण होते. नवनीतला प्रसूतीकळा सुरू झाल्याने तिला मेरठमधल्या मवाना इथल्या केजेके रुग्णालयात दाखल करण्यात आले; पण सर्जरीदरम्यान नवनीतचा मृत्यू झाला. अतिरक्तस्त्राव झाल्याने नवनीतचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरने तिचा पती आणि कुटुंबीयांना सांगितले. नवनीतच्या मृत्यूने संदीपच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.

नवनीतच्या मृत्यूने संदीप पार खचला. जड अंतकरणाने त्याने नवनीतच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. अस्थी विसर्जनासाठी संदीप दुसऱ्या दिवशी मृतदेहाची राख आणण्यासाठी स्मशानभूमीत गेला. राख गोळा करत असताना राखेतून त्याला एक अशी वस्तू सापडली, जी पाहून त्याला धक्का बसला. राखेत त्याला चक्क सर्जिकल ब्लेड सापडले. रुग्णालयात ऑपरेशनसाठी सर्जिकल ब्लेडचा वापर केला जातो. पत्नी नवनीतच्या शस्त्रक्रियेदरम्यान सर्जिकल ब्लेड तिच्या पोटातच राहिले. त्यामुळे नवनीतचा मृत्यू झाल्याचा आरोप संदीप आणि त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.



मृतदेहाच्या राखेत सर्जिकल ब्लेड सापडल्याने संदीपने रुग्णालय आणि शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली आहे. संदीप आणि त्याच्या कुटुंबीयांनी मुख्यमंत्री कार्यालयातही याबाबत तक्रार दाखल केली आहे. मेरठच्या मुख्य अधिकाऱ्यांनी घटना समोर आल्यानंतर रुग्णालयाचा परवाना रद्द करून चौकशीचे आदेश दिले आहेत. यासाठी एक समिती गठित करण्यात आली आहे.

## न्यायाधीशांची अवमानास्पद टिप्पणी

भारतात न्यायालयीन कामकाजाची व्हिडीओग्राफी केली जाते. अनेकवेळा या न्यायालयाच्या कामकाजात अनेक न्यायमूर्ती असे बोलतात, की जे त्यांच्या पदाच्या प्रतिष्ठेला शोभत नाही. काही दिवसांपूर्वीच कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी बेंगळुरूच्या एका भागाचा उल्लेख ‘मिनी पाकिस्तान’असा केला. त्यावरून त्यांच्यावर बरीच टीका होत असतानाच आता न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी आणखी एक वादग्रस्त विधान केले आहे. या वेळी त्यांनी अंतर्वस्त्राबाबत महिला वकिलाला कमेंट केली आहे.

काही काळापूर्वी कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती वेदव्यासचार श्रीशानंद यांनी पश्चिम बंगळुरूमधील एका क्षेत्राला ’मिनी पाकिस्तान’ म्हटले होते. त्यांचा हा व्हिडीओ ‘सोशल मीडिया’वर व्हायरल झाला होता. त्यानंतर न्यायमूर्ती श्रीशानंद यांचा आणखी एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागला आहे. त्यांनी महिला वकिलाला असंवेदनशील आणि आक्षेपार्ह गोष्टी सांगितल्या. दुसऱ्या महिला वकिलाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिल्याने न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी उच्च न्यायालयातील महिला वकिलाला फटकारले. आपले मत मांडताना त्यांनी न्यायमूर्तींच्या प्रतिष्ठेचा अवमान केला. न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी महिला वकिलाला सांगितले, की तिला विरोधी वकिलाबद्दल बरेच काही माहीत आहे आणि पुढच्या वेळी ती त्यांच्या अंतर्वस्त्रांचा रंगदेखील सांगू शकते. कर्नाटक उच्च न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान हा संपूर्ण प्रकार घडला. न्यायमूर्ती श्रीशानंद यांच्या या असंवेदनशील आणि वादग्रस्त टिप्पणीवर अनेक जण नाराजी व्यक्त करत आहेत. हा व्हिडीओही ‘सोशल मीडिया’वर चांगलाच व्हायरल होत आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्रीशानंद यांच्या या आक्षेपार्ह टिप्पणीवर अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रसिद्ध वकील इंदिरा जय सिंह यांनी या प्रकरणाचा व्हिडीओ शेअर करताना लिहिले, की आम्ही भारताच्या सरन्यायाधीशांना विनंती करतो, की त्यांनी या न्यायमूर्तींविरुद्ध स्वतःहून कारवाई करावी आणि त्याला लैंगिक संवेदना प्रशिक्षणासाठी पाठवावे. आता सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक उच्च न्यायालयाकडून म्हणणे मागितले आहे.



# स्मार्ट सिटीने बदलले पूर्व नागपूरचे चित्र : नितीन गडकरी

## पूर्व नागपुरातील विविध कामांचे नितीन गडकरी यांच्या हस्ते भूमीपूजन व लोकार्पण



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

स्मार्ट सिटी असणाऱ्या नागपूर शहरात सर्वत्र विकास होत आहे. शैक्षणिक संस्था, आरोग्य विषयी सोयीसुविधा, पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय, चांगले रस्ते, उड्डाणपूल, मेट्रो यामुळे शहर बदलत चालले आहे, अशात पूर्व नागपूरचा विकास देखील झपाट्याने होत आहे, स्मार्ट सिटीने पूर्व नागपूरचे चित्र बदलले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. ते नागपूर महानगरपालिका आणि नागपूर स्मार्ट अँड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्व नागपूरातील विविध कामांचे लोकार्पण व भूमिपूजन प्रसंगी बोलत होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पूर्व नागपूरातील विविध कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात आले. पुनापूर पारडी येथे आयोजित कार्यक्रमात पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार कृष्णा खोपडे, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, नागपूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा-चांडक, सहपोलीस आयुक्त निसार तांबोळी मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रमोद शेवाळे, मनपाच्या मुख्य अभियंता लिना उपाध्ये, पोलीस उपायुक्त श्री.निकेतन कदम, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपक सेलोकर यांच्यासह इतर मनाप व पोलीस अधिकारी, कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, पूर्व नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे केली जात आहे. परिणामी पूर्व नागपूरचे चित्र बदलले आहे.

मागील दहा वर्षांमध्ये सर्वांत जास्त बदल पूर्व नागपूरमध्ये झाला आहे. या भागातील बहुतांश अडचणी दूर झाल्या आहेत. स्थानिक नागरिकांना उत्तम सोयी सुविधा प्राप्त झाले आहेत परिणामी त्यांचे जीवन सुखर झाले आहे, हॅप्पी ह्युमन इंडेक्स मध्ये चांगली वाढ होत असल्याचे सांगत गडकरी यांनी नागरिकांना उत्तम आरोग्य विषयी सोयीसुविधा मिळाव्या याकरिता तयार करण्यात आलेल्या रुग्णालयांना धर्मदाय आयुक्त यांच्या कडे नोंदणीकृत असलेल्या चांगल्या ट्रस्टला चालवायला द्यावे असे सूचित केले.

तसेच नागपूर शहरातील सार्वजनिक वाहतूक सेवेसाठी पयार्यी इंधनाचा वापर करण्यावर भर द्यावा, इथेनॉल, सीएनजी, इलेक्ट्रिकवर धावणाऱ्या बसेस शहरात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा, याशिवाय विकासकांनी शहराला स्मार्ट व सुंदर साकारण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही गडकरी यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करीत आमदार श्री. कृष्णा खोपडे यांनी पूर्व नागपूरच्या विकासाचे श्रेय केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी व उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांना दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी लोकार्पण आणि भूमिपूजन झालेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. तसेच विविध विकास कामांसाठी सरकार द्वारे भरीव निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे धन्यवाद दिले. तर पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांनी सांगितले की, पोलीस ठाण्याच्या इमारती स्मार्ट झाल्या असून, आता पोलीस आणखी स्मार्ट झाले झाले पाहिजेयाकडे आमचा लक्ष राहणार आहे गुन्हा व गुन्हेगारावर चांगलाच वचक बसला असून, अपघात मुक्त शहर कसे होईल याकडे आपले लक्ष असल्याचे सांगितले. तसेच पोलिसांसाठी उत्तम सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या बाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी मनपा व स्मार्ट सिटी प्रशासनाचे धन्यवाद व्यक्त केले.

विकास प्रकल्पासाठी अनिल सारडा प्रसन्न ढोक, मुरारी काबरा यांनी आपली जागा प्रशासनाला दिली आहे. यातील श्री. अनिल सारडा यांचा व हंसवाहिनी कन्स्ट्रक्शनचे देवेन पाडगल यांचा सत्कार गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनपाचे जनसंपर्क अधिकारी श्री मनीष सोनी यांनी केले व आभार ही त्यांनीच व्यक्त केले. कार्यक्रमात मनपाचे अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी श्री. मनोज तलेवार, नागपूर स्मार्ट सिटीच्या भानुप्रिया ठाकूर, राजीव दुफारे, डॉ. शील घुले, डॉ. प्रणिता उमरेकर, ओम प्रकाश लांडे मोईन हसन, राज्य अनुसूचित जाती जमातीचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम माजी नगरसेवक दीपक वाडीभस्मे प्रामुख्याने उपस्थित होते.

क्वेटा कॉलनीमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त निधीमधून देवाडिया सूतिकागृहाची निर्मिती केली जाणार आहे. या सूतिकागृहामुळे स्थानिक वस्तींमधील जनतेला आरोग्याची उत्तम सुविधा उपलब्ध होणार आहे.

नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पुनापूर येथे पोलीस स्टेशन बांधण्यात आले आहे पोलीस स्टेशनची इमारत सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज आहे. केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत अमृत योजना अंतर्गत नंदनवन कॉलनी मधील तसेच सिम्बायोसिस कॉलेज जवळील वाठोडा येथील प्रत्येकी २० लक्ष लीटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे लोकार्पण करण्यात आले.

# शासकीय वस्तीगृहातील ५० विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा

■ महासागर प्रतिनिधी,
लातुर, दि. ६ :

पुरणमल लाहोटी सरकारी पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहणाऱ्या जवळपास ५० विद्यार्थिनींना रात्रीच्या जेवणातून विषबाधा झाल्याचा प्रकार घडला आहे. त्रास झालेल्या विद्यार्थिनींवर विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु आहेत. तसेच सर्व विद्यार्थिनींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

शनिवारी हा प्रकार घडला. या वसतीगृहातील विद्यार्थिनींना सायंकाळी ७.३० वाजता जेवण देण्यात आले होते. यात भेंडीची भाजी, चपाती, भात आणि मसूरच्या दाळीचे सूप या पदार्थांचा समावेश होता. मात्र, रात्री ८.३० वाजताच्या सुमारास अचानक काही विद्यार्थिनींची प्रकृती बिघडली. तर काहींना अचानक मळमळ होऊन उलट्या सुरु झाल्या.

त्यानंतर वसतीगृहाच्या अधिक्षकांनी तत्काळ याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिली.

दरम्यान, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी रुग्णवाहिका बोलावून या विद्यार्थिनींना विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. तसेच याची माहिती विद्यार्थिनींच्या पालकांनाही देण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार मध्यरात्रीपर्यंत जवळपास ५० विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर रविवारी पहाटे जवळपास २० विद्यार्थिनींना वसतीगृहात परत पाठवण्यात आलं.

यासंदर्भात बोलताना विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहिते म्हणाले, की रात्रीच्या जेवणानंतर काही विद्यार्थिनींना मळमळ आणि उलट्या होत होत्या. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर आता काही विद्यार्थ्यांनींना वसतीगृहात परत पाठवण्यात आलं आहे. तर काही विद्यार्थिनींवर उपचार सुरू आहेत. सर्व विद्यार्थिनींची प्रकृती आता स्थिर आहे.

याप्रकरणी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.डी. नितनवरे यांनीही प्रतिक्रिया दिली. या घटनेची माहिती मिळताच आम्ही विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल केले होते. तसेच याची माहिती त्यांच्या पालकांना दिली होती.

आता सर्व विद्यार्थिनींची प्रकृती स्थिर आहे. काही विद्यार्थिनींना पुन्हा वसतीगृहात पाठवण्यात आलं आहे. तर काहींवर उपचार सुरू आहेत, असे त्यांनी सांगितलं. तसेच याप्रकरणी तपास सुरु करण्यात आला असून अन्नाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.

# मोटार-टेम्पो अपघातात मायलेकासह चौघांचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी
सोलापूर, दि. ६ :

माळशिरस तालुक्यातील नातेपुतेजवळ कारुंजे गावच्या हद्दीत मोटार आणि टेम्पो यांच्या अपघातात दोघा मायलेकासह चौघांचा मृत्यू झाला तर अन्य तिघेजण जखमी झाले. रविवारी सकाळी घडलेल्या अपघाताची नोंद नातेपुते पोलीस ठाण्यात झाली आहे.

इंदापूर तालुक्यातील लासुर्णे येथील राजेश अनिल शहा (वय ५५) यांच्यासह त्यांच्या कारखान्यातील कामगार दुर्गेश शंकर घोरपडे (वय २८), कोमल विशाल काळे (वय ३२) आणि तिचा मुलगा शिवलाल विशाल काळे (वय १०) अशी या अपघातातील चौघा मृतांची नावे आहेत. जखमींमध्ये आकाश दादा लोंढे (वय २५), पल्लवी बसवेश्वर पाटील (वय ३०) आणि अश्विनी दुर्गेश घोरपडे यांचा समावेश आहे.

मृत राजेश शहा हे आपल्या कंपनीतील कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना घेऊन सातारा जिल्ह्यातील कासपठाराच्या सहलीला निघाले होते. सकाळी त्यांनी इंदापूर सोडले होते. पुणे-पंढरपूर मार्गावरून कासपठारच्या दिशेने जात असताना, लासुणेपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर कारुंजे (ता. माळशिरस) गावच्या हद्दीत पुलावरून त्यांची मोटार चुकीच्या दिशेने धावत होती. तेव्हा या मोटारीची दुसऱ्या एका टेम्पोला धडक बसून हा अपघात झाला. या अपघाताची माहिती कळताच नातेपुते पोलिसांसह वरिष्ठ पोलीस अधिकारी अपघातस्थळी दाखल झाले. जखमीवर नजीकच्या रुग्णालयात औषधोपचार सुरू आहेत.





"दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा, कनेक्टिव्हीटी, उत्पादकता, शाश्वत उपाय आणि सुरक्षा या सर्वांची हमी देणाऱ्या अत्याधुनिक पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी आमचे सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे."
**नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

भूमीपूजन समारंभ

रस्ते वाहतूक व महामार्ग विभाग भारत सरकार द्वारा
केंद्रीय रस्ते निधी (CRIF) अंतर्गत मंजुर
पारशिवनी तालुक्यातील दहेगाव (जोशी) ते ईसापूर रस्त्यावरील कन्हान नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे जि. नागपूर

पूलाची लांबी : ३२० मीटर । प्रकल्पाची किंमत : ₹ ५४ कोटी

प्रकल्पांचे फायदे

नागपूर सावनेर (NH-४७) व आमडी पारशिवनी खापा (NH-७५३) हे दोन राष्ट्रीय महामार्ग जोडले जातील.

या प्रकल्पामुळे सावनेर ते पारशिवनी तालुका जोडल्या जात असुन प्रवासाचे अंतर ४० किमी ने कमी होणार आहे. त्यामुळे प्रवासाचा कालावधी दिड तासाने कमी होणार आहे.

या प्रकल्पामुळे नागपूर सावनेर महामार्ग NH-४७ हे सरळ पारशिवनी व रामटेक तालुक्यातील पेंच अभयारण्याने जोडले जाणार आहे.

या प्रकल्पामुळे पारशिवनी मध्ये उपलब्ध खनिज साठा हा कमी वेळेत नागपूर NH-४७ ने जोडला जाऊन थेट बुटीबोरी येथील औद्योगीक वसाहतीस जोडून कमी वेळेत माल वाहतूक होणार आहे.

पारशिवनी तालुक्यातील शेतकऱ्यांना शहरातील बाजारपेठ व वाहतुकीस सोयीस्कर प्रकल्प.

सोमवार, ०७ ऑक्टोबर २०२४

भूमिपूजन : दहेगाव (जोशी) ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर, वेळ : दुपारी १.३० वाजता
जाहीर सभा : इसापूर, ता. सावनेर, जिल्हा नागपूर, वेळ : दुपारी २.०० वाजता

शुभहस्ते
**नितीन गडकरी**
केंद्रीय मंत्री, रस्ते परिवहन व महामार्ग विभाग, भारत सरकार

कार्यक्रमाचे अध्यक्ष
**देवेंद्र फडणवीस**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा

प्रमुख उपस्थिती

श्यामकुमार बर्वे, खासदार, रामटेक लोकसभा क्षेत्र | प्रविण दटके, विधान परिषद सदस्य | अभिजीत वंजारी, विधान परिषद सदस्य | चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषद सदस्य | सुधाकर अडबाले, विधान परिषद सदस्य
डॉ. परिणय फुके, विधान परिषद सदस्य | कृपाल तुमाने, विधान परिषद सदस्य | ॲड. आशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य, रामटेक विधानसभा | मुक्ता कोकड्डे, अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर

@nitingadkary @officeOfNG | @nitin_gadkari @OfficeOfNG | @gadkari.nitin | gadkari.nitin | Nitin Gadkari